RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
# शिव वाणी

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक ३७ | सोमवार दि.२९ सप्टेंबर २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -37 | MONDAY DT.29 SEPTEMBER 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES

# मराठवाड्यात अतिवृष्टीचा कहर, ६ जणांचा मृत्यू, २१३ जनावरांचा बळी, शेकडो घरांचे नुकसान

## आतापर्यंतची आकडेवारी समोर



छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाल्याचं समोर आलं आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे एकूण ६ जणांचा मृत्यू झाला आहे. नांदेड जिल्ह्यात वीज पडून १ व्यक्तीचा मृत्यू झाला. धाराशिवमध्ये ३ जण वाहून गेले. तसेच नांदेड आणि बीडमध्ये प्रत्येकी १ अशा २ जणांचा मृत्यू झाला आहे. तर धाराशिव जिल्ह्यात ५ तर बीड जिल्ह्यात १ व्यक्ती जखमी झाली आहे.

जनावरांचे नुकसान

अतिवृष्टीत एकूण २१३ जनावरे मृत्यूमुखी पडली आहेत. यामध्ये धाराशिवमध्ये ८१, जालना जिल्ह्यात ४० जनावरे दगावली. दुधाळ जनावरांपैकी ९८ मोठी आणि ८६ लहान जनावरे, तर ओढकाम करणारी २५ मोठी आणि ७ लहान जनावरे दगावली आहेत.

मालमत्तेचे नुकसान

मराठवाड्यात एकूण ८९२ खाजगी मालमत्तांची पडझड झाली आहे. त्यापैकी धाराशिवमध्ये ६११, लातूर मध्ये ८९, छत्रपती संभाजीनगर मध्ये ७३, नांदेडमध्ये ५६, परभणी मध्ये ४२ आणि जालन्यात २१ घरांचे नुकसान झाले आहे.

सार्वजनिक सुविधांचा फटका

सार्वजनिक मालमत्तेमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ४ रस्ते वाहून गेले आहेत. तसेच मराठवाड्यात एकूण ९ पूल वाहून गेले असून यामध्ये छत्रपती संभाजीनगरचे ४, बीडचे ४ आणि परभणीतील १ पूल समाविष्ट आहेत. याशिवाय ८ शाळांचे नुकसान झाले असून धाराशिवमधील ६ आणि छत्रपती संभाजीनगरमधील २ शाळांचा समावेश आहे.

गोदावरी नदीला महापूर

गोदावरीचे उगमस्थान असलेल्या नाशिक जिल्ह्यात दरवर्षी जोरदार पाऊस होतो. त्याच पाण्यामुळे संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी धरणात पाणीसाठा जमा होतो. मात्र, सध्या राज्यात सर्वदूर पाऊस होत आहे. त्यातच नाशिकमध्ये झालेल्या पावसाने गोदावरीला पूर आला आहे. पुढे संभाजीनगरमध्येही पाऊस सुरू झाल्यानं गोदावरीच्या पाण्यात मोठी वाढ झाली असून जायकवाडी पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाचे २७दरवाजे उघडण्यात आलेत. पुढे नांदेड जिल्ह्यातही पाऊस सुरू असल्यानं तिथंही गोदावरी नदी दुधडी भरून वाहत असून नदीकाठच्या गावांमधील शेतांमध्ये पाणी साचलं आहे.

# माजलगाव धरणातून ११गेटद्वारे ११३९२४.७४ क्युसेसने पाण्याचा विसर्ग



माजलगाव (प्रतिनिधी) मागील काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील सर्व लहान-मोठे तलाव तुडुंब भरली असून,त्यातील पाण्याचा प्रवाह माजलगाव धरणात वेगाने येत असल्याने माजलगाव धरण तुडुंब भरले आहे.त्यामुळे धरणाचे टप्प्या टप्प्याने ११ दरवाजे उघडले आहेत.या दरवाजातून ११३९२४.७४ क्युसेसने सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडण्यात आले आहे.

तर या धरणातून मोठ्याप्रमाणात तालुक्यात अतिवृष्टीने छोटीमोठी धरण तर भरलीच आहेत.पण शेताला छोट्या तळ्याचे स्वरूप आले आहे.धरणाचे पाणी पाहण्यासाठी बघ्याची तोबा गर्दी होत आहे. त्यामुळे तहसीलदार संतोष रुईकर व पोलीस प्रशासन यांना हटवाण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

माजलगाव धरण कार्यक्षेत्रातील सिंदफणा नदीसह कुंडलिका नदी,तसेच बिंदुसरा ही धरणे तुडुंब भरली आहेत.त्यातील पाण्याचा प्रवाह मोठ्याप्रमाणात चालु आहे.त्यामुळे माजलगाव धरणाचे पाणी नदीपात्रात सोडण्याचे प्रमाण जादा होऊ शकते.त्यामुळे प्रशासनाने माजलगाव,मनूर,लुखेगाव, गोविंदपूर,सांडस चिंचोली, देपेगाव,नागडगाव,रोशनपुरी या नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

# गुटक्यावर दोन ठिकाणी छापे, दीड लाखाचा ऐवज जप्त



बीड /प्रतिनिधी

गुटखा विक्रीवर कडक कारवाई करण्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी दिलेले निर्देश अंमलात आणत आज सकाळी दोन ठिकाणी छापे टाकण्यात आले.

गुप्त माहितीच्या आधारे थिगळे गल्लीतील किराणा दुकानात विक्री करणारा अशोक गणेश लाल लोहिया व राज गल्ली बीड येथील किराणा दुकानात विक्री करणारा सय्यद लतीफ सय्यद शहा मोहम्मद यांच्याकडून गुटखा जप्त करण्यात आला.एम एच २३ - ४६९८ क्रमांकाची रिक्षा व गुटखा मिळून एकूण दीड लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.तपासात उघडकीस आले की हा गुटखा गेवराई येथील एका व्यक्तीकडून पुरवठा केला जात होता.शहरातील गुटखा विक्री पूर्णपणे बंद व्हावी यासाठी बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील सर्व टपरी चालकांना बोलावून गुटखा न विकण्याची सूचना देण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हनपुडे पाटील, पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. बाबा राठोड, पोलीस अमलदार संजय राठोड, सुशेन उगले, मंगेश शिंदे आदींनी केली आहे.

## दै.समर्थ राजयोगच्या वतीने दिला जाणारा

# दानशूर उद्योगपती रतन टाटा समाज भूषण पुरस्कार पी एस गुजर यांना जाहीर



बीड /प्रतिनिधी

मराठवाड्यातील अग्रगण्य दैनिक राजयोगच्या वतीने दिला जाणारा दानशूर उद्योगपती रतन टाटा समाजभूषण पुरस्कार छत्रपती संभाजी नगर येथील समाजसेवक पी एस गुजर यांना देण्यात येणार असल्याचे संपादक वैभव स्वामी यांनी जाहीर केले आहे.

सामाजिक, आरोग्य, पर्यावरण, शैक्षणिक, क्रीडा, कर्मचारी कामगार विकास, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य असलेल्या समाजसेवकांना हा सन्मानाचा पुरस्कार दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने प्रतिवर्षी दिला जातो. यावर्षीचा पुरस्कार छत्रपती संभाजीनगर येथील वाळूज महानगर नागरी विकास कृती समितीचे अध्यक्ष श्री पी एस गुजर यांना जाहीर झाला आहे. श्री पी एस गुजर यांचे विविध क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना यापूर्वी शासकीय व सामाजिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, नवोदित उद्योजकांना बिझनेस ट्रेनिंग, पर्यावरण क्षेत्रात विशेष कार्य तसेच सामाजिक शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे. दानशूर उद्योगपती रतन टाटा समाज भूषण पुरस्कार त्यांना जाहीर झाल्याबद्दल विविध क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## डॉक्टर नव्हे तर देवदूतच

# डॉ.अनिल पवारांनी काढले पोटातून गजग्यासारखे मोठे तब्बल २८ खडे



बीड /प्रतिनिधी

येथील प्रतिथयश डॉक्टर तथा मूत्रविकार, किडनी व कॅन्सर तज्ञ डॉ.अनिल पवार यांनी सोनपेठमधील एका ४२ वर्ष रुग्णाच्या पोटातून तब्बल २८ खडे काढले आहेत.अतिशय जोखमीच्या या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टरांचे आभार मानले. किडनी तज्ञ डॉक्टर अजित घोडके व हार्ट स्पेशलिस्ट डॉ.सुनील बोबडे यांनी त्यांना सहकार्य केले.

बीडमध्ये मूत्रविकार व कॅन्सर तज्ञ डॉ.अनिल पवार आणि डॉ.गणेश डोळे यांनी एकत्रित येत वेलनेस हॉस्पिटल उभारले आहे.गुंतागुंती आणि जोखमीच्या शस्त्रक्रियेत या दोघांचा मोठा हातखडा आहे.सोनपेठमधील एका रुग्णाला मागच्या काही दिवसापासून पोटात दुखत होते. त्याची किडनी जवळपास पूर्णपणे निकामी झाली होती.डायलिसिसची गरज होती. त्रास फार असल्याने त्याने बीड शहरातील शिवराज पण सेंटर समोरील वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलला येत डॉक्टरांना दाखविले.यावेळी सोनिग्राफी केल्यानंतर रुग्णाच्या पोटातर मुतखडे असल्याचे समोर आले.डॉक्टरांनी त्यांना शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला परतु खडे फार मोठे असल्यामुळे व किडनी काम करत नसल्यामुळे शस्त्रक्रिया करताना जीवाला धोका होऊ शकतो, ऑपरेशन करणे रिस्की आहे असे सांगितल्यामुळे पेशंटने सुरुवातीला पुणे नंतर मुंबई येथे दाखवले परतु ऑपरेशनचा खर्च दोन ते अडीच लाख रुपये लागत असल्यामुळे त्यांना तो परवडणारा नव्हता म्हणून शेवटी डॉक्टर अनिल पवार यांच्यावर विश्वास ठेवून त्यांनी बीडमध्येच योजने मार्फत मोफत शस्त्रक्रिया करण्याचे ठरवले शस्त्रक्रिया गुंतागुंतीची व मोठी असल्यामुळे ती मेडिकेअर सुपर स्पेशलिटी व क्रिटिकल केअर मध्ये केली आणि पेशंटच्या पोटातून तब्बल २८ खडे बाहेर काढण्यात आले.एवढे मोठे खडे रुग्णाच्या पोटात असल्यामुळे त्याला असह्य वेदना होत्या.डॉक्टरांनी ही जोखमीची शस्त्रक्रिया किडनी तज्ञ डॉक्टर अजित घोडके व हार्ट स्पेशलिस्ट डॉ.सुनील बोबडे यांच्या उपस्थितीत केली.दरम्यान ही शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आली असून भूलतज्ञ म्हणून डॉक्टर प्रियंका इथापे मॅडम यांनी काम पाहिले वेलनेस व मेडिकेअर हॉस्पिटल मधील कर्मचाऱ्याने डॉक्टरांना मदत केली . ऑपरेशन पूर्णपणे मोफत व शंभर टक्के यशस्वी केल्यामुळे रुग्णाने व त्यांचे नातेवाईकांनी डॉक्टरांचे आभार मानले आहेत.



# घनसावंगी तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्याचा बेजबाबदारपणा उघड!

संजय गांधी विभाग सकाळी साडेदहा वाजेपर्यंत बंद जनतेत संतापाची लाट

घनसावंगी / मारोती सावंत

घनसावंगी तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांची निष्काळजी वृत्ती पुन्हा एकदा जनतेसमोर उघडकीस आली आहे. तहसील कार्यालयातील संजय गांधी विभाग हा सामान्य नागरिकांच्या कामांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून सकाळी साडेदहा वाजेपर्यंत देखील या विभागाचे दरवाजे उघडलेले नव्हते. त्यातच विभागातील एकही कर्मचारी कार्यालयात उपस्थित नव्हता.नागरिकांच्या तातडीच्या कामासाठी आलेल्या शेकडो लोकांना ताटकळत दाराशी उभे राहावे लागले. वृद्ध, महिला, शेतकरी, विद्यार्थ्यांना या निष्काळजीपणामुळे प्रचंड गैरसोय झाली. सरकारकडून सुरू केलेल्या योजना व लाभांचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या सर्वसामान्यांचा मौल्यवान वेळ या लेट-लतीफ कर्मचाऱ्यांमुळे वाया गेला.स्थानिक नागरिकांच्या तोंडून चांगलाच संताप व्यक्त होताना दिसून आला. सरकारी कार्यालये लोकांसाठी चालतात की फक्त कर्मचाऱ्यांच्या मनमानीसाठी ?असा जळजळीत सवाल जनतेतून उपस्थित होत आहे.जनतेतून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ठाम मागणी होत आहे की अशा उशिरा हजेरी लावणाऱ्या निष्काळजी आणि जनतेच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. अन्यथा संतप्त जनता मोठ्या प्रमाणावर आंदोलनाचा इशारा देत आहे.

जनतेच्या सोयीसाठी असलेले कार्यालय जरच नागरिकांना त्रासदायक ठरत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना कर्तव्यच्युत मानून जबाबदारीची जाणीव करून देणे अत्यावश्यक आहे.असा ठाम सूर नागरिकांतून उमटतो आहे.

## बीड स्थानिक गुन्हे शाखा कडुन आरोपीला अटक

# तीन घरफोड्या उघडकीस



बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या व घरफोड्या सारख्या गुन्हयाला प्रतिबंधक व्हावा व गुन्हे उघडकीस यावेत यासाठी पोलीस अधीक्षक बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांचे अधिपत्याखाली वेगवेगळे पथके तयार करुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी आदेशीत केले होते.

पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, बीड याचे मार्गदर्शनाखाली महेश विघ्ने व पथकातील अमंलदार हे पोलीस स्टेशन वडवणी गुरंन १९४/२०२५ कलम, ३३१(२), ३०५ बी.एन.एस. मधील आरोपीचा शोध घेत असतांना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, सदरचा गुन्हा हा राजपालसिंग अजससिंग भादा रा. सिंदखेडराजा जि. बुलढाला यांने व त्याचे साथीदारासह मिळुन केला आहे. अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने सदरची माहीती पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना देऊन त्यांचे मार्गदर्शनाखाली पथकातील अधिकारी व अमंलदार यांनी सापळा रचुन संशईत आरोपी राजपालसिंग अजससिंग भादा रा. सिंदखेडराजा जि. बुलढाला यास दिनांक २८/०९/२०२५ रोजी सिंदखेडराजा जि. बुलढाण येथुन राहते घरातुन ताब्यात घेतले. त्याच्या कडुन १) पोलीस स्टेशन वडवणी गुरंन १९४/२०२५ कलम, ३३१(२), ३०५ बी.एन.एस २) पोलीस स्टेशन केज गुरंन ४५६/२०२५ कलम ३०३,३०५ (अ) बी.एन.एस ३) पोलीस स्टेशन पिंपळनेर गुरंन २१७/२०२५ कलम ३०५, ३३१(४) बी.एन.एस अन्वये गुन्हे उघड करुन नमुद गुन्हयातील एकूण ८०,०००/- मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपी कडून आनखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. इतर आरोपीचे शोध कामी पथक रवाना केले आहेत. पुढील तपास पोलीस स्टेशन वडवणी व स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील पोलीस अधीकारी करीत आहेत. सदरची कामगिरी वरिष्टांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा बीड चे पो.नि. श्री. शिवाजी बंटेवाड, पोलीस उप-निरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार जफर पठाण,

# संपादकीय

## नको हे विरोधक

निम्म्या महाराष्ट्राला अतिवृष्टीने उद्ध्वस्त केल्यानंतर हवामान विभागाने कालच आणखी किमान दोन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज दिला आहे. ५ ऑक्टोबरनंतरच मान्सून परतीला निघेल, असंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे. पावसाने या आठवड्यात महाराष्ट्रात उडवलेला हाहाकार ज्यांनी प्रत्यक्ष बघितला असेल किंवा ज्यांनी त्याची दृश्य टीव्हीवर पाहिली असतील, ते हवामान खात्याचा नवा अंदाज पाहून खोल काळजीत बुडाल्याशिवाय राहणार नाहीत! निसर्गाने उभी केलेली संकटं अशी असतात, की ती रोखता येत नाहीत. त्यांच्यापासून काही प्रमाणात आपला बचाव करता येतो. पावसाचं येणं, न येणं पूर्णपणे त्याच्या लहरीवर असतं. ना आग्रहाने तो येतो, ना थांब म्हटल्याने तो थांबतो. त्याची कृपा (किंवा अवकृपा) स्वीकारण्याशिवाय आपल्या हाती काही नसतं. विज्ञानाच्या प्रगतीने अशा संकटांच्या काही आगाऊ सूचना मिळाल्याच, तर मनाची तयारी करायला थोडा वेळ मिळतो; नुकसान रोखण्यासाठी आवश्यक ती काळजीही काही प्रमाणात घेता येते. पण, शेतात उभ्या पिकाचं, फळबागांचं काय करणार? पिकं काढणीला आली असतील, तर घाईने कापणी करता येते. पिकली फळं उतरवून ठेवता येतात. पण, हे सगळे प्रयत्न आपलं नुकसान त्यातल्या त्यात कमी करण्याचे असतात. त्यापेक्षा अधिक काही आपल्या हाती नसतं. म्हणूनच पावसाचे बदलणारे पॅटर्न समजावून घेऊन त्यानुसार आपण आपली शेती, जगणं मापणं आवश्यक असतं. महाराष्ट्रातच काय, पूर्ण देशातच अशी वेळ आली आहे. या क्षेत्रातील आपली संशोधनं आपल्याला त्या दिशेने न्यावी लागणार आहेत.

परतीच्या पावसाने दणका देण्याचं हे काही पहिलं वर्ष नाही. यापूर्वी आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेशच्या पूर्व भागात परतीच्या पावसाने महापूर यायचे. गावं जलमय व्हायची. पण, या वर्षीचं चित्र अगदी वेगळं आहे. जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशाबरोबरच गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, हरियाणा, दिल्ली, पंजाब या राज्यांतही परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. देशाचं धान्याचं कोठार म्हणून जी राज्यं गणली जातात, त्या पंजाब, हरियाणात झालेली अतिवृष्टी आणि आलेले पूर देशाला अन्नधान्याच्या बाबतीत मोठा फटका दिल्याशिवाय राहणार नाहीत. अन्यत्र झालेल्या अतिवृष्टीनेही डाळी, कडधान्य, सोयाबीन, कापसाच्या पिकाचं मोठं नुकसान झालं आहे. देशाचा शेती उत्पादनाचा मूळ हिशोबच यावर्षी पूर्ण बिघडून जाणार आहे. हे नुकसान नक्कीच कमी नसेल. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात, दिवाळीनंतर याबाबतचे अंदाज समोर येतील. बदललेल्या निसर्गचक्राने भारतीय शेतीचं; आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेचं किती नुकसान केलं आहे, ते त्यावेळी कळेल. पूर्वी वारावादळं होत नव्हती, ढगफुटी होत नव्हत्या असं नाही. त्याचं प्रमाण अपवादात्मक असे. आता ते सर्रास होऊ लागलं आहे. मान्सूनचं वेळेपूर्वी आगमन, कमी वेळात अचानक जास्त कोसळणं आणि त्यानंतर मुक्काम लांबवणं या पूर्ण चक्राचाच गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. हे बदललेलं चक्र शेती आणि शेतकऱ्याच्या मुळावर आलंच आहे. पण, देशाच्या पायाभूत सुविधा यंत्रणांवरही त्याचा परिणाम होतो आहे. रेल्वे, रस्ते इमारती, मोठे पूल, वीज वाहिन्यांचं जाळं, दूरसंचार नेटवर्क हा पाऊस उद्ध्वस्त करतो आहे. शेती आणि पर्यावरणीय नुकसानीला याची जोड दिली, तर बदललेल्या पाऊसमानाचा आपल्या अर्थव्यवस्थेला किती मोठा फटका बसतो आहे, हे लक्षात येईल. अशा नुकसानीचा विचार करताना कधीच मानवी भावभावना, आकांक्षा, स्वप्नं, नातेसंबंधावर कसं पाणी फिरतं, याची मोजदाद होऊ शकत नाही. ती करता आली, तर हे नुकसान मोजण्याच्या पलीकडचं असेल! या सगळ्या प्रतिपादनाचा मथितार्थ एवढाच, की पावसाचा हा बदललेला स्वभाव पाहून त्यानुसार आपल्याला तातडीने उपाययोजना कराव्या लागतील. कृषी शास्त्रज्ञांवर याची सर्वात मोठी जबाबदारी असेल. जोडीला हवामानशास्त्रज्ञ, अभियंते, नगर रचनाकार आणि व्यवस्थापन तज्ज्ञांची जोडही लागेलच. अचानक येणाऱ्या पाण्याच्या लोंढ्यांचा निचरा होण्यासाठी काँक्रिटीकरणाच्या वेडाला आवर घालणं, जुन्या ओढ्या-नाल्यांना पुनरुज्जिवीत करणं, नद्यांभोवतीची अतिक्रमणं दूर करणं, नद्यांची पात्र रुंद आणि खोल करणं, तलाव-धरणातले गाळ काढणं या उपाययोजना प्राधान्यक्रमाने आणि कठोरपणे अमलात आणाव्या लागतील. अन्यथा, दरवर्षी संपत्तीची, मानवी कर्तृत्वाची मोठी हानी होत राहील. त्याच्या नुकसान भरपाईसाठी पैशाच्या राशी ओततच राहाव्या लागतील. महाराष्ट्रात अतिवृष्टी झालेल्या अनेक गावांचा संपर्क पाऊस थांबून दोन दिवस झाले, तरी अद्याप शक्य नाही. साचलेलं पाणी आणि चिखल यामुळे तिथपर्यंत मदत घेऊन जाणंही सोपं नाही. तरीही मंगळवारी मंत्रिमंडळाची बैठक झाल्या झाल्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह संपूर्ण मंत्रिमंडळ महाराष्ट्राच्या सर्व अतिवृष्टीग्रस्त भागात पोहोचलं होतं, ही अभिनंदनीय बाब आहे. त्याबाबत समाधान व्यक्त करायचं सोडून विरोधी पक्षांनी पुन्हा तीच ठरलेली टीका सुरू केली आहे. लोकांनी ज्यांना विरोधी बाजूला ढकललं, त्यांनी सतत अवास्तव मागण्याच करत राहिलं पाहिजे, संकटात सापडलेल्यांच्या दुःखावर फुंकर घालण्याऐवजी त्यांची मनःशांती बिघडवली पाहिजे असा नियम नाही. पण, एकदा बेजबाबदारपणा अंगी भिनला, की तारतम्याशी संबंध सुटतो. महाराष्ट्रातल्या विरोधी पक्षांची भूमिका आणि भाषा पाहता त्याचाच प्रत्यय येतो आहे. हवामान खात्याचा पुढचा अंदाज तर त्यांच्या गावीही दिसत नाही. निम्मा महाराष्ट्र प्रचंड अडचणीत असताना आणि आणखी संकटाचे ढग डोक्यावर जमा होत असताना तरी त्यांनी स्वतःला आवरलं पाहिजे

# दोन दिवसात महापालिकने केले ९७० पुरग्रस्तांचे स्थलांतर

### शोध व बचाव कार्यामध्ये अग्निशमन अधिकारी के.जी.दासरे व त्यांच्या टीमचे धाडसी कार्य

नांदेड /प्रतिनिधी

**नांदेड शहरात सुरु असलेल्या मुसळधार पावसाने शहरातील जनजिवन विस्कळीत झाले असुन नागरीकांच्या मदतीला मनपा प्रशासन धावुन जाऊन मागील दोन दिवसापासुन मतदकार्य करीत आहे. याच पार्श्वभुमीवर मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी दिनांक २८ रोजी रविवारी शहरातील सखल भागातील विविध पुरग्रस्त भागांना व महापालिकेने स्थापित केलेल्या निवारा केंद्रांना भेटी देऊन व्यवस्थेची पाहणी केली आहे.**

यावेळी आयुक्तांनी शहरातील नदीपात्रालगत व सखल भागात पाणी शिरल्याने महानगरपालिकेच्या वतीने पाण्याचा निचरा करण्याची प्रक्रिया व नागरीकांच्या स्थलांतरीत प्रक्रियेची पाहणी केली. याचबरोबर आयुक्तांनी महापालिकेने स्थापित केलेल्या तात्पुरत्या निवारण केंद्रास भेट देऊन नागरीकांची विचारपुस केली. मागील दोन दिवसांत महापालिका प्रशासनामार्फत एकुण ९७० नागरीकांना स्थलांतरीत करुन सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. शोध व बचाव कार्यामध्ये महापालिकेच्या अग्निशमन विभागातील अधिकारी के.जी.दासरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष कार्य पार पाडले आहे. निवारा केंद्रात आश्रय घेतलेल्या नागरीकांना महापालिकेतर्फे जेवण, पिण्याचे पाणी इत्यादी जिवणावश्यक वस्तु पुरविण्यात येत असुन सदरील ठिकाणी आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता, फवारणी, प्राथमिक आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. याचाच आढावा आयुक्तांनी प्रत्यक्ष निवारा केंद्रास भेट देऊन घेतला आहे. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त स.अजितपालसिंघ संधु, नितीन गाढवे, निलेश सुंकेवार, शहर अभियंता सुमंत पाटील, क्षेत्रिय अधिकारी गौतम कवडे यांची उपस्थित होते.

या भेटीदरम्यान मनपा आयुक्तांनी एनटीसी मिलएरिया, पाकीजा फंक्शन हॉल, लिबर्टी फंक्शन हॉल, आणि नंदगिरी किल्ला या निवारा केंद्रांना भेट दिली. महापालिकेच्या निवारा केंद्रावर आश्रय घेतलेल्या आयुक्तांनी पुरग्रस्त भागातील नागरीकांशी संवाद साधुन महापालिका प्रशासन आपणास हवी ती मदत करण्यास तत्पर असल्याचे आश्वासन देऊन आयुक्तांनी नागरीकांना धीर देण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे पुराचे पाणी ओसरेपर्यंत निवारा केंद्र कोणत्याही परिस्थितीत न सोडण्याचे आवाहन यावेळी आयुक्तांनी केले तसेच निवरा केंद्र परिसरामध्ये प्रकाश व्यवस्था, साफ-सफाई, फवारणी, इत्यादी बाबींची चोख व्यवस्था ठेवून या सर्व बाबींचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळले जाईल याची दक्षता घेण्याबाबत सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना आदेशित केले. यावेळी नागरिकांनी महापालिकेमार्फत पुरविन्यात येणाऱ्या सुविधे बाबत समाधान व्यक्त केले आहे.

याप्रसंगी पत्रकारांशी संवाद साधताना आयुक्तांनी नदीने ३५१ मीटरची इशारा पातळीवर ओलांडून ३५४.८९ मीटर ही पातळी सध्या गाठली असून पुढील २४ तास हीच स्थिती कायम राहण्याची शक्यता असल्याने नदी लगतच्या नागरिकांनी कुठलाही विलंब न करता तात्काळ जवळच्या निवारा केंद्रात स्थलांतरित व्हावे असे आवाहन यावेळी मनपा आयुक्तांनी केले आहे. त्याचप्रमाणे नागरीकांनी शहरात उदभवलेल्या पुरजन्य परिस्थितीत घाबरुन न जाता मदतीसाठी महानगरपालिकेच्या आपत्ती शाखेला किंवा जवळच्या क्षेत्रिय कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# मुसळधार पावसाने गल्हाटी नदीला पूर;

## पिठोरी-सीरसगाव पाण्याखाली

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केली पाहणी



अंबड /प्रतिनिधी

गोदावरीची उपनदी म्हणून ओळखली जाणारी गल्हाटी नदी सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे रुद्रावतार धारण करत पिठोरी-सीरसगाव परिसराला जलमय करून गेली आहे. नदीकाठची घरे पाण्याखाली जाऊन अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. जीवनावश्यक वस्तू पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्या असून शेतकरी वर्गाला मोठा फटका बसला आहे.सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ऊस, मोसंबी अशी पिके वाहून गेली किंवा पाण्यात सडत आहेत. अस्मानी संकटाने शेतकरी कुटुंबे हतबल झाली आहेत.या भीषण परिस्थितीची माहिती वंचित बहुजन आघाडीचे युवा तालुकाध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य किशोर भगवान तुपे साहेब यांनी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांच्या कानावर घातली. ही बाब समजताच मंत्री महोदयांनी तत्काळ पिठोरी-सीरसगावला धाव घेतली.तलाठी शिंदे आणि ग्रामसेवक जे.डी. चव्हाण यांच्या समवेत त्यांनी पूरग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेतली.पाहणीनंतर केंद्रीय मंत्री आठवले यांनी प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले की नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पंचनामे तातडीने करावीत.शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देऊन दिलासा द्यावा.प्रशासन शेतकऱ्यांच्या सोबत असून मदत कार्यात कोणतीही ढिलाई होऊ नये.या भेटीप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष किशोर भगवान तुपे साहेब, सरपंच कृष्णा आटोळे, माजी सरपंच रामेश्वर माने, उपसरपंच पांडुरंग उढान, सदस्य प्रेमानंद उढान, आप्पासाहेब उढान, लखन तुपे, भास्कर खरात, भागवत उढान, शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष उमेश पाष्टे, तसेच मुकेश डूचे, दिगंबर भारती यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.गावकऱ्यांनी मंत्री महोदयांच्या तात्काळ प्रतिसादाचे समाधान व्यक्त करत प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी अशी ठाम मागणी केली.



## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला झिरपीचे सरपंच संदीप भवर धावले

अंबड /प्रतिनिधी

मुसळधार पावसाने संपूर्ण महाराष्ट्रात थैमान घातले असून अनेक भागात ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, उस, तूर यासारखी पिके पाण्याखाली गेली आहेत. काहींच्या घरामध्ये पाणी शिरून जीवनावश्यक वस्तू वाहून गेल्या तर शेतातील विहिरी, बांध कोसळले आहेत. शेतकरी वर्गावर मोठे संकट कोसळले असून अनेक कुटुंब संकटग्रस्त झाले आहे.या कठीण प्रसंगी झिरपी गावचे विकासाभिमुख व शेतकरी पुत्र सरपंच संदीप भवर शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आले आहेत. शेतकऱ्यांच्या वेदना ओळखून त्यांनी आपले एक वर्षाचे संपूर्ण मानधन मुख्यमंत्री सहायता निधीस वर्ग करण्याचा निर्णय घेतला असून यासंदर्भात प्रशासनाला अधिकृत लेखी पत्र दिले आहे.

शेतकऱ्यांच्या संकट काळात दाखवलेली ही संवेदनशीलता आणि त्यागाची भावना सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे. सरपंच भवर यांचा हा आदर्श सर्व गावांच्या सरपंचांनी व लोकप्रतिनिधींनी घेण्याची गरज असल्याचे मत ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.शेतकरी हा देशाचा आर्थिक कणा आहे; त्यांच्या दुःखाच्या काळात आपण सर्वांनी हातभार लावणे हीच खरी समाजसेवा आहे असे संदीप भवर यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

# शेतकऱ्यांनी आत्महत्येचा विचारही मनात आणू नये

### प्रसिद्ध टीव्ही वृत्तनिवेदक विलास बडे यांची शेतकऱ्यांना आर्त साद



घाटशिळ पारगाव येथे बडेमुद्दे लाईव्ह

बीड/ प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी आस्मानी संकटांना न घाबरता मोठ्या धीराने संकटांचा सामना करावा आत्महत्येचा विचारही मनात आणू नये, एकमेकांशी प्रेमाने वागा, एकमेकाला मदत करा, संकटेच एकमेकांना एकत्र आणतात जातीपाती, गरीब श्रीमंत आणि राजकारण हा भेदाभेद दुर करून एकोप्याने राहा शेवटी संकटात माणसेच माणसाच्या कामी येतात असे आवाहन आयबीएन लोकमत वाहिनीचे वृत्त निवेदक विलास बडे यांनी घाटशिळ पारगाव येथील ग्रामस्थांना आणि तमाम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना केले आहे.

शुक्रवार दि.२६ रोजी सायंकाळी ७:५५ वाजता आयबीएन लोकमत बडे मुद्दे हा कार्यक्रम शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथील पूर परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या व्यथा यावर दाखवण्यात आला. या कार्यक्रमासाठी ते घाटशिळ पारगाव येथे आले होते.त्यानंतर त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी डॉ.तुकाराम नेहरकर, नवनाथ खेडकर,प.स.सदस्य प्रकाश खेडकर अशोक खेडकर साहेब,जीवन खेडकर,मोहन खेडकर,राजेंद्र खेडकर महादेव ढाकणे,बबन खेडकर, शिवदास खेडकर ,मंडाबाई गायकवाड,शोभा कांबळे आदींनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या त्यानंतर विलास बडे यांचा डॉ.तुकाराम नेहरकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी परिसरातील नुकसानग्रस्त शेतकरी,सरपंच मीराबाई खेडकर, उपसरपंच गिताताई जीवन खेडकर श्री जाधव साहेब तलाठी बबन नेहरकर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खाकी वर्दीतला शेतकरी माणूस धावला

## शेतक-यांच्या मदतीला

### एका महिन्याचा पगार दिला पूरग्रस्तांना - पोलीस निरीक्षक चिंचोलकरांनी पूरग्रस्तांना १ महिन्याचा पगार देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली



नवीन नांदेड/ प्रतिनिधी

शेतकरी कुटुंबात जन्मलेले आणि ग्रामीण जीवनाशी घट्ट नाळ असलेले नांदेड ग्रामीण स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी आपल्या माणूसकीचे दर्शन घडविले आहे. सामाजिक बांधिलकी जपत निरीक्षक चिंचोलकर यांनी सप्टेंबर महिन्याचा पगार पूरग्रस्तांच्या मदतीला दिला आहे. तशी विनंती करणारे पत्र चिंचोलकर यांनी शनिवारी (दि. २७) पोलीस अधीक्षकांना पाठवले आहे.

पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांनी पत्रात नमूद केले आहे की, यंदा इतर जिल्हयाप्रमाणे नांदेड जिल्हयामध्ये पण मोठ्या प्रमाणात पाऊस झालेला आहे. सततच्या पावसामुळे अनेक गावात, शेतात पाणी शिरुन जनजिवन विस्कळीत झाले आहे. मनुष्यहाणी, पशुधन हानी, मोठ्या प्रमाणात झाले असुन शेती पिकाचे, संसार उपयोगी वस्तुंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पोलीस निरीक्षक म्हणुन मी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे कार्यरत आहे. यापूर्वीही मी अनेक वर्षे नांदेड जिल्यामध्ये कर्तव्य बजावलेले आहे. तसेच मी स्वतः शेतकरी कुटुंबातील असुन यवतमाळ मधील एका पुरग्रस्त गावातील रहिवासी आहोत, त्यामुळे आम्हाला पुरपरिस्थीतीची जवळुन जाणीव आहे.नांदेड जिल्हयामध्ये पोलीस प्रशासनामध्ये काम करत असल्यामुळे नांदेड जिल्हयाशी आमची प्रशासकीय सोबतच सामाजीक बांधीलकी आहे. त्यामुळे सामाजीक बांधीलकी म्हणुन पुरग्रस्तांसाठी मदत म्हणुन आम्ही आमचा एक महीन्याचा पगार सप्टेंबरचे एक लाख रुपये देत असल्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पत्रात नमूद केले आहे. तशी विनंती करणारे पत्र चिंचोलकर यांनी शनिवारी (दि. २७) पोलीस अधीक्षकांना पाठवले आहे.

चिंचोलकर यांनी पुरगस्तांना केलेली मदत कौतुकास्पद

पोलीस ठाण्यात पातळीवर गुन्हेगारी कंट्रोल ठेवण्यासाठी सराईत गुन्हेगारांचा सिंघम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओमकार चिंचोलकर यांनी पुरगस्तांना केलेली मदत कौतुकास्पद असल्याची सर्वत्र चर्चा होत आहे.

# फरार ३०७ चा आरोपी पोलिसांच्या जाळ्यात;

## शिरूर कासार पोलिसांचे मोठा यश

### गेल्या तीन महिन्यापासून होता फरार

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार तालुक्यातील हनुमानवाडी येथे शेतीच्या वादातून झालेल्या बेदम मारहाण प्रकरणात कुऱ्हाडीने घाव घातल्याने घाव जिव्हारी लागून तब्बल तीन जण जखमी झाले होते याप्रकारणी तब्बल तीन महिन्यांपासून फरार असलेला आरोपी संभाजी उर्फ अभिषेक बाळू पवार याला अखेर शिरूर कासार पोलिसांनी सीताफितीने ताब्यात घेतले.

अहिल्यानगर येथे लपून बसलेला आरोपीचा गुप्तचरा मार्फत सुगावा लागल्याने काल आरोपीच्या मुसक्या आवळण्यात आल्या असून हे शिरूर कासार पोलिसांसाठी मोठे यश मिळाले आहे.हनुमानवाडी येथे काही महिन्यांपूर्वी शेतीच्या वादातून झालेल्या हल्ल्यात तीन जणांना मारहाण करून गंभीर जखमी केले होते. या प्रकरणात आरोपी संभाजी पवार हा घटनेनंतर फरार झाला होता. त्याचा माग काढण्यासाठी पोलिसांनी अनेकदा सापळे रचले मात्र तो चकवा देत होता.

आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव यांच्या सूचनेनुसार, पोलीस उपनिरीक्षक देविदास खांडखुळे, पोलीस हवालदार बाळासाहेब सुरवसे, पोलीस अंमलदार सतीश बहिरवाळ यांनी काल रात्री सीताफितीने आरोपीला अटक केली.अटक केलेल्या आरोपीला आज न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास खांडखुळे करत आहेत.

स्थानिकांमध्ये पोलिसांच्या या कारवाईचे कौतुक होत असून गेल्या काही महिन्यांपासून दडपणात असलेल्या गावकऱ्यांनी दिलासा व्यक्त केला आहे.

# छत्रपती शाहू महाराज व पहिली विद्यार्थिनी मुक्ता साळवे यांच्या चौकाचे वडवणीत अनावरण

वडवणी /प्रतिनिधी

आज दि २८-०९-२०२५ रोजी वडवणी शहरातील मेन रोडवर छत्रपती राजश्री शाहू महाराज व पहिली विद्यार्थिनी मुक्ता साळवे यांच्या चौकाचे अनावरण विविध मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी अनेक क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.

सविस्तर वृत्त असे की, वडवणी शहरातील मेन रोडवर आरक्षणाचे जनक छत्रपती राजश्री शाहू महाराज व पहिली विद्यार्थिनी मुक्ता साळवे यांच्या चौकाचे अनावरण करण्यात आले.यानंतरही शहरांमध्ये अनेक महापुरुषांचे चौक आहेत या चौकाकडे बघून तरुणांनी प्रेरणा घ्यावी



संपूर्ण महापुरुषांचे विचार अमलात आणावेत व त्यानुसार आपली वाटचाल करावी हाच या चौकाच्या मागचा उद्देश असतो तो इतरांनी सुद्धा प्रत्येकाने घेतला पाहिजे. जेणेकरून आपलं भविष्य उज्वल होईल सर्वच महापुरुषांनी या महाराष्ट्रासाठी, भारतासाठी आपलं योगदान दिलेलं आहे त्यांनी जो इतिहास करून ठेवलेला आहे तो जिवंत ठेवण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे. आणि हा इतिहास पुढच्या पिढीला ज्ञात आसला पाहिजे यासाठी चौकाचं महत्व समजुन घेतलं पाहिजे.

# नावा मनपाच्या अग्नीशामक दलाने पाण्याने वेढलेल्या हायटेक सिटी मधील २५ जणांना काढले बाहेर

नांदेड /प्रतिनिधी

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेच्या अग्नीशामक दलाचे अधिकारी के.एस,दासरे व पथकाने असना नदीच्या पाण्यामुळे हायटेक सिटी तरोडा येथील सोसायटी मध्ये पाणी जमा झाले होते. तेथील २५ रहिवाशांना त्या ठिकाणावून स्थलांतरित करण्यात आले.



नावा मनपाच्या हायटेक सिटी येथे असना नदीचे पाणी शिरल्याने अहिल्या मुत्तेपल्ले वय ७०,राजेंद्र जैन वय ६०,राहुल जैन वय ४०, प्राची जैन वय ३५,आर्यन जैन वय १०,रत्नमाला जैन वय ५० सार्थक जैन वय ५,कृष्ण मुद्दड वय ३०,वरद जगेलपुरे वय १५, सृष्टी मुत्तेपाल वय १८,अंजली मुत्तेपाल वय १६,सुरेखा मुत्तेपाल वय ४०,अरुण मुत्तेपाल वय ४८,सुरवी मुद्दड,वय ३०, सुमु बैस,वय १०,सुहाना बैस वय १४,ज्योती मकमले वय ३०संतोष मकमले वय ४२,शिवम मकमलेवय १५,लताबाई बैस वय ८० ,तुषार बैस वय १८, वीराज जैन वय १९, आशुतोष मुतापले वय २५,शिवाजी बैसवय ३८, विशाल मुद्दाड वय ६ यांना सदरील ठिकाणी बचाव कार्याचे काम नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अग्निशमन व आपत्कालीन सेवा मार्फत अग्निशमन अधिकारी के. एस दासरे, उप अग्निशमन अधिकारी निलेश कांबळे, लांडगे, गीते, शिंदे, ताटे,खंदारे, वाहन चालकनरवाडे यांनी कार्ये केले.

# गोदावरी नदीचा काठी असलेल्या मुजामपेठ येथील नागरीकांच्ये स्थलांतर

## जवळपास पंधरा प्रतिष्ठाणे पाण्याखाली

नांदेड /प्रतिनिधी

विष्णुपुरी जलाशयातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने गोदावरी नदीच्या काठी असलेल्या धनेगाव मुजामपेठ भागातील जवळपास विस कुटुंबातील चाळीस ते पंचेचाळीस जणांना स्थलांतरीत करण्यात आले असून ग्रामपंचायत कार्यालय धनेगाव मुजामपेठ यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळा जुने मुजामपेठ येथे करण्यात आली आहे, अचानक होत असलेल्या पाणी वाढ मुळे मात्र नागरिकांत भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गोदावरी नदीच्या काठी असलेल्या धनेगाव मुजामपेठ ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत असलेल्या नांवघाट परिसरातील अनेक निवासस्थानी पाणी शिरल्याने जवळपास विस कुटुंबातील चाळीस ते पंचेचाळीस जणांना स्थलांतरीत करण्यात आले तर पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात होत असल्याने गोदावरी नदी लगत असलेल्या जवळपास विविध प्रतिष्ठाने असलेल्या परिसरातील गजाळी, टाईल्स,चहाचे हॉटेल, वेल्डिंग दुकान, गॅरेज,किराणा होलसेल दुकनात पाणी शिरल्याने जिवनाश्यक वस्तू सह अनेक वस्तू नुकसान झाले आहे,तर परिसरातील ऊस्मना बी आफमान मदरसा येथील ८० विध्यार्थी स्थलांतर करण्यात आले.सरपंच गंगाधर ऊर्फ पिंटू पाटील शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, यांच्या सह माजी पंचायत समिती सदस्य भुजंगराव भालके, ग्रामविकास व्हि.पी.सुर्यवंशी, तलाठी सौनटक्के, ग्रामपंचायत सदस्य शेख फारूक अब्दुल्ल गफुर, अब्दुल गफुर अब्दुल कादर, सामाजिक कार्यकर्ते शेख एजाज शेख बाबु, शिवाजी बुचडे, तातेराव ढवळे ,रफी अहमद,शेख कौसर,शेख जकीर,शेख खालेद,शेख अंनिस शेख फारूक व ग्रामपंचायत कर्मचारी शेख मुख्तार शेख फारूक,शेख निसार शेख बाबु,




# जायकवाडी धरणातून वाढलेला विसर्ग आणि आपत्ती व्यवस्थापन आ.बबनराव लोणीकराची उपजिल्हाधिकारी आर.डी.सी.यांच्याशी चर्चा

जालना /प्रतिनिधी

जिल्ह्यातील गोदावरी नदीकाठच्या गावांवर सध्या अतिवृष्टीमुळे गंभीर संकट कोसळले आहे. नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील मुसळधार पावसामुळे जायकवाडी धरण भरून वाहत असून धरणातून तब्बल २.२५ लाख क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे नदीकाठची शेती, सखल वस्त्या आणि रस्त्यांना धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर दि. २८ सप्टेंबर २०२५ आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना निवासी उपजिल्हाधिकारी आर.डी.सी. यांच्याशी आपत्ती व्यवस्थापनाच्या उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण चर्चा केली.जायकवाडी धरणात २.५० लाख क्युसेकपेक्षा अधिक आवक सुरू असून, जलाशय पूर्ण क्षमतेने भरला आहे.

प्रशासनाने रेड अलर्ट जारी केला असून, नदीकाठची गावे विशेष सतर्कतेखाली ठेवण्यात आली आहेत.पुढील २४ तास निर्णायक असणार असून, नागरिकांनी सतत प्रशासनाशी संपर्क ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.आमदार बबनराव लोणीकर यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण सूचना एसटी महामंडळाच्या गाड्यांचा वापर स्थलांतरासाठी,नदीकाठच्या सखल भागातील कुटुंबांना सुरक्षित स्थळी नेण्यासाठी जालना डेपोतील २०० हून अधिक एसटी गाड्यांचा तातडीने वापर करावा,परतूर-जालना मार्गासारख्या भागात विशेष शटल सेवा चालवावी. गुराढोरे व जनावरांचेही स्थलांतर करण्याचे आदेश द्यावेत,शाळा खोल्यांचा तात्पुरता निवारा जिल्ह्यातील ५०० पेक्षा अधिक जिल्हा परिषद व खासगी शाळा तातडीने मदत केंद्र म्हणून सज्ज कराव्यात.



येथे आरोग्य तपासणी, अन्न व पाणीपुरवठा सुनिश्चित करावा. लहान मुलांसाठी स्वतंत्र केंद्र उभारण्यावर भर द्यावा. महाविद्यालये व तांत्रिक संस्थांचे सभागृह मोठ्या क्षमतेची सभागृहं (१,०००+ क्षमतेची) स्थलांतरित नागरिकांसाठी खुली करावीत.विद्यार्थी स्वयंसेवक पथके मदत कार्यात सहभागी करून घ्यावीत.मंदिरे व देवस्थान समितीच्या सभागृहांमध्ये अन्नछावण्या सुरू कराव्यात.धार्मिक नेत्यांच्या सहकार्याने स्वच्छता, पाणी व वीज पुरवठ्याची जबाबदारी निश्चित करावी.महसूल, पंचायत, पोलीस व आरोग्य विभागांना २४ तास सज्ज राहण्याचे आदेश.

नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा.

राष्ट्रीय आपत्ती हेल्पलाइन क्रमांक : १०७७ जालना जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्ष : ०२४८२-२३१०००,सन २००६ मधील महापुरातून शिकलेल्या धड्यांच्या आधारे संसाधनांचा एकात्मिक वापर करण्यावर लोणीकर यांनी भर दिला. सध्या जिल्ह्यातील २० हून अधिक गावांमध्ये तातडीने स्थलांतर सुरू करण्यात आले आहे. संभाव्य धोके व नागरिकांसाठी सल्ला

नदी पातळीत ५-१० फूट वाढ होण्याची शक्यता.शेती, रस्ते व पूल धोक्यात येऊ शकतात.मच्छीमार व नदीकाठच्या रहिवाशांनी नदीपात्र टाळावे.गुराढोरे सुरक्षित उंच ठिकाणी हलवावीत.संकटकाळात प्रशासनाने सर्व संसाधनांचा उपयोग करून नागरिकांचे प्राण व संपत्ती वाचवणे हेच सर्वोच्च प्राधान्य आहे. अफवा पसरवू नका, अधिकृत सूचनाच पाळा, असे आवाहन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.




**मौजे बोंढार तर्फे नेरली (ता. नांदेड) येथे मागील आठ दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसाने आसना नदीला आलेल्या पुरामुळे रामराव गोपाळराव शिंदे (हळदेकर) यांच्या शेतातील फार्मवर सहा नागरिक अडकून पडले होते. स्थानिक प्रशासन व ग्रामस्थांनी दाखवलेल्या धाडसामुळे अखेर सर्वांचा थरारक बचाव करण्यात यश आले.**

**अडकलेल्यांमध्ये व्यंकट दत्ता वरपडे (४०), छाया व्यंकट वरपडे (३५), संस्कृती व्यंकट वरपडे (१३), दिगंबर बाजीराव पाथरपल्ले (५५), सुमनबाई दिगंबर पाथरपल्ले (४०) व बाजीराव दिगंबर पाथरपल्ले (२१) यांचा समावेश होता.**

**बचावासाठी तलाठी डी. एम. पाटील व रामराव गोपाळराव शिंदे (हळदेकर) यांनी स्वत: पाण्यात उतरून रसीच्या सहाय्याने, तसेच गावकऱ्यांच्या मदतीने प्रयत्न केले. ग्रामस्थांनी दाखवलेल्या एकजुटीमुळे अखेर सर्व नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.या घटनेमुळे स्थानिक प्रशासन व ग्रामस्थांचे धाडस तसेच तत्परता अधोरेखित झाली आहे.**

# महिला महाविद्यालयात 'रासेयो' चे स्वच्छता अभियान

गेवराई (प्रतिनिधी) जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा अभियान- २०२५' अंतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या अंतर्गत स्वच्छता रॅली चे आयोजन करुन महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला.

भारत सरकार, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय आणि उच्च शिक्षण विभाग रासेयो कक्ष महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती निमित्त दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी 'एक दिन, एक घंटा' राष्ट्र स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे. गेवराई येथील महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा



योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शिवाजी दिवाण आणि प्रा. डॉ. संगिता आहेर यांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ करुन स्वच्छता विषयी जनजागृती व्हावी यासाठी गेवराई मध्ये स्वच्छता रॅली काढण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व स्वयंसेविका यांची उपस्थिती होती.

# सातव्या माळी निमित्ताने भक्ताची रेणूका देवी गडावर गर्दी भक्तांच्या नवसाला पावणारी सोमठाणा येथील रेणुका देवी

बदनापूर ---(प्रतिनिधी) बदनापूर तालुक्यातील सोमठाणा येथील नवरात्र उत्सवाने श्री रेणुका देवीचे मंदिर नवरात्रात भक्तगणांनी फुलून गेलेले आहे. बदनापूर शहरापासून जवळच असलेल्या सोमठाणा गडावर श्री रेणूका माता मंदिर मोठे विलोभनीय दिसते .भक्तांच्या हाकेला धावून जाणारी व भक्तांची इच्छापूर्ती करणारी देवी असे भाविकांमध्ये स्थान निर्माण करणारी श्री रेणुकादेवी आहे.एक जागृत देवस्थान म्हणून बदनापूर व परिसरातील हे मंदिर ओळखले जाते.मंदिराच्या गांभार्यात सुंदर असा तांदळा (मुकूट) आहे.देवीच्या चेह-यावर तेजपुज्य व मनमोहक असे भाव दिसतात.मंदिरात प्रवेश केल्यानंतर मन प्रसन्न होते, प्रफुल्लित होते .येथे जालना , छत्रपती संभाजी नगरसह मराठवाड्यातील भाविक भक्त नवरात्रीत येथे हजेरी लावतात.श्री रेणूका देवी संस्थान सोमठाणा मार्फत भाविकांसाठी विविध कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले.नवरात्रोत्सव सुरू झाल्या पासून म्हणजे पहिल्या माळीपासुन भाविकांची मोठी गर्दी होत आहे.तालूक्यातील सोमठाणा येथील डोंगरावर श्री रेणुका देवीची मंदिर आहे. आख्यायिकेनुसार या देवीची स्थापना ब्रम्हदेवाने केली असल्याचे सांगितले जाते डोंगरावर एक पाण्याचे छोटे कुंड आहे.या कुंडात बारा महिने पाणी असते या कुंडात आंघोळ केल्यास त्वचारोग बरे होतात अशी भाविकांची श्रद्धा आहे. नवरात्रीच्या काळात भक्तगण या कुंडात स्नान करण्यासाठी गर्दी करतात.भाविकांच्या मते देवी येते स्वयंभू निर्माण झाली असून सतयुगात महादेव व पार्वती या डोंगरावर गमन करण्यासाठी आले असता पार्वतीला हा परिसर आवडल्याने त्यांनी येथे वास्तव्य करण्याचा हट्ट धरला येथील डोंगरावर स्वयंभू हाऊन स्थिरावले.रेणुकामाता हे पार्वतीचे रूप आहे.असे मानले जाते.श्री रेणुका देवीच्या मंदिराच्या पायथ्याशी महादेव मंदिर असून येथील पिंड प्राचीन आहे.तसेच येथे भगवान परशुराम यांचे मंदिर उभारले आहे. या ठिकाणी जगदंबा ,तुळजाभवानी मातेचे मंदिर आहे .श्री रेणुका देवी व महादेव मंदिर (ट्रस्ट )संस्थानची स्थापना श्री राजेन्द्र भैया जैस्वाल यांनी केल्यानंतर या देवस्थानाला विकासाचा वेग आला या देवस्थानाला पर्यटन स्थळाचा दर्जाही मिळालेला आहे.संस्थानच्या वतीने अनेक विकासकामे झालेली आहे.सोमठाणा डोंगराच्या पायथ्याशी अप्पर दुधना धरण असून यात ब-याच प्रमाणात पाणी साठलेले असल्याने येथील निसर्गाच्या कुशीतील या मंदिरात भाविकांची गर्दी होत असते.या वर्षी संस्थानचे अध्यक्ष रामकिसन मेंढरे यांच्या अध्यक्षतेखाली नित्यनेमाने विधिवत घट स्थापना,सप्तशिती पाठ, आरती, भागवत पूजा, तसेच अष्टमीला होम,हवन पूजा होते दररोज सायंकाळी ९ वाजता कीर्तन सेवा होत आहे. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरावसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



## आलेगाव येथे वादळी वाऱ्यात विद्युत तार पडून तरुणाचा मृत्यू

नांदेड /प्रतिनिधी

कंधार तालुक्यातील आलेगाव येथील सायंकाळी चार ते पाच च्या दरम्यान ढगफुटी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस चालू होता. त्यावेळी येथील पाहुणे गोविंद लक्ष्मण खाडे वय ४३ वर्ष राहणार सिद्धनाथ तालुका नांदेड जिल्हा नांदेड येथील रहिवाशी होते ते त्यांचे पाहुणे केशव नामदेव मोरे यांच्या घरी भेटण्यासाठी आले होते. गोविंद लक्ष्मण खाडे मुसळधार पाऊस चालू असल्याने ते गावातील मारुती मंदिराजवळ थांबून होते. पण वादळी वाऱ्यासह पाऊस जोर वाढत असल्याने चालू असलेल्या कारणामुळे त्यांनी गावातील केशव नामदेव मोरे त्यांच्या पाहुणे यांच्या घराकडे निघाले असता रस्त्यातील वाटेतील पोल वरील विद्युत जोडणी असलेला सर्विस वायर ऋख तार अंगावर पडून शॉट लागला यात ते गंभीर जखमी झाले.

गोविंद लक्ष्मण खाडे यांना विष्णुपुरीच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना मयत घोषित केले. त्यांच्या पश्चात एक मुलगा मुलगी व पत्नी असा परिवार होता. अशी माहिती सरपंच बळवंत पाटील यांनी दिले आहे. याप्रकरणी उस्मानगर पोलीस स्टेशन येथे या घटनेची माहिती दिली आहे. सदरील घटनेमुळे परिवारावर मोठे संकट कोसळले असून प्रशासनाने संबंधित घटनेचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक सहकार्य करावे,अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

# राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडून नांदेडच्या परिस्थितीचा आढावा

नांदेड /प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल रविवारी नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी २८ सप्टेंबर रोजी १३ मंडळात झालेली अतिवृष्टी तसेच गोदावरी, मांजरा, मन्याड नद्यांच्या लाभक्षेत्रात पूरस्थिती निर्माण झाली होती त्याचबरोबर नांदेड जिल्ह्यातील पूर परिस्थितीचा आढावा घेतला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नांदेड नांदेड जिल्ह्यात झालेल्या परिस्थितीचा आढावा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या कडून घेतला. २७ सप्टेंबर रोजी २३, तर २८ सप्टेंबर रोजी १३ मंडळात अतिवृष्टी झाली. गोदावरी, मांजरा, मन्याड नद्यांच्या लाभक्षेत्रात पूरस्थिती निर्माण झाली. ६७ लोकांना सुरक्षित वाचवण्यात आले आहे- नांदेडमध्ये ३०४ आणि लोहामध्ये १२० लोकांना मदत शिबिरात ठेवण्यात आले असून, त्यांना सर्व सुविधा पुरविण्यात येत आहेत. एकूण १६ मदत शिबिरे तयार करण्यात आली आहेत. ५६ घरांची पडझड झाली असून, त्यांना तातडीने मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

नांदेड जिल्ह्यात पुन्हा यलो अलर्ट..!

नांदेड जिल्ह्यात प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि २८. सप्टेंबर रोजी रविवारी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि २८ रोजी ३० सप्टेंबर पुढील तसेच दि. ०१ व ०२ ऑक्टोबर या चार दिवसांसाठी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केलेला आहे. दि. २८ सप्टेंबर २०२५ या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार स्वरूपाचा व दि. ३० सप्टेंबर २०२५ तसेच दि. ०१ व ०२ ऑक्टोबर २०२५ हे तीन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी असे विशेष आवाहन करण्यात आले आहे.

# बौढार येथे शेतकरी सुखरूप बाहेर ..!

नांदेड /प्रतिनिधी

मौजे बोंढार तर्फे नेरली (ता. नांदेड) येथे मागील आठ दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसाने आसना नदीला आलेल्या पुरामुळे रामराव गोपाळराव शिंदे (हळदेकर) यांच्या शेतातील फार्मवर सहा नागरिक अडकून पडले होते. स्थानिक प्रशासन व ग्रामस्थांनी दाखवलेल्या धाडसामुळे अखेर सर्वांचा थरारक बचाव करण्यात यश आले.

अडकलेल्यांमध्ये व्यंकट दत्ता वरपडे (४०), छाया व्यंकट वरपडे (३५), संस्कृती व्यंकट वरपडे (१३), दिगंबर बाजीराव पाथरपल्ले (५५), सुमनबाई दिगंबर पाथरपल्ले (४०) व बाजीराव दिगंबर पाथरपल्ले (२१) यांचा समावेश होता.बचावासाठी तलाठी डी. एम. पाटील व रामराव गोपाळराव शिंदे (हळदेकर) यांनी स्वत: पाण्यात उतरून रसीच्या सहाय्याने, तसेच गावकऱ्यांच्या मदतीने प्रयत्न केले. ग्रामस्थांनी दाखवलेल्या एकजुटीमुळे अखेर सर्व नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.या घटनेमुळे स्थानिक प्रशासन व ग्रामस्थांचे धाडस तसेच तत्परता अधोरेखित झाली आहे.

# भालकी उपविभागीय अधिकारी खल्लाळ यांच्या रेस्क्यू ऑपरेशन माध्यमातून नागरिकांचा थरारक बचाव



नांदेड /प्रतिनिधी

नांदेड तालुक्यातील भालकी परिसरात सुरू असलेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे आसना नदी व नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला. या पुराच्या पाण्यामुळे मौजे भालकी शिवारातील शेतांमधील आखाड्यावर तब्बल २४ नागरिक अडकून पडले होते. त्यामध्ये ३ लहान मुले, ८ महिला आणि १३ पुरुष यांचा समावेश होता.

घटनेची माहिती प्रशासनाला मिळताच उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ व तहसीलदार संजय वारकड यांनी प्रसंगावधान दाखवत तातडीने एसडीआरएफ (डींरींश ऊळीरींशी ठश- ीिपीश ऋेीलश) पथकाला संपर्क केला. तात्काळ दोन बोटींसह एसडीआरएफचे जवान घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक प्रशासन व ग्रामस्थांच्या मदतीने रात्री उशिरा अंधारात तब्बल दहा वाजेपर्यंत चाललेल्या थरारक रेस्क्यू ऑपरेशननंतर सर्व २४ नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. या प्रसंगी मा आमदार बालाजीराव कल्याणकर हे देखील घटनास्थळी उपस्थित होते.बचावकार्य संपल्यानंतर सर्व नागरिकांना सुरक्षित निवारा केंद्रावर नेण्यात आले. तेथे त्यांच्यासाठी जेवण व झोपण्याची योग्य सोय प्रशासनाच्या वतीने करण्यात आली.या धाडसी बचावकार्यात एसडीआरएफ पथकासोबत स्थानिक अधिकारी व ग्रामस्थांनीही सक्रिय सहभाग नोंदविला. यामध्ये मंडळ अधिकारी तरोडा शिवानंद स्वामी, मंडळ अधिकारी कुणाल जगताप, तलाठी गोपीनाथ कल्याणकर, अविनाश करंदीकर, कृषी सहाय्यक वसंत जारिकोटे, तसेच प्रभाकर शेजुळे (सरपंच चिखली बुद्रुक), राजू धाडवे (सरपंच भालकी), गणेश धाडवे, लक्ष्मण कल्याणकर व समस्त गावकऱ्यांनी मोठी मदत केली.

# मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी तौरल इंडियाचा मदतीचा हात



बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अतिवृष्टी आणि मांजरा नदीला आलेल्या पुरामुळे अनेक गावांना मोठ्या प्रमाणावर फटका बसला आहे. या आपत्तीच्या काळात सामाजिक बांधिलकी जपत तौरल इंडिया कंपनीने पुढाकार घेत पूरग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात दिला आहे. कंपनीतर्फे पूरग्रस्त भागात जीवनावश्यक वस्तूंच्या किट्सचे वाटप करण्यात आले.

भरत गीते, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, तौरल इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यातून तात्काळ टीम रवाना करण्यात आली. कोणताही विलंब न करता ही टीम बीड जिल्ह्यात दाखल झाली आणि प्रभावित गावांमध्ये आवश्यक वस्तूंचे किट्स पोहोचवण्यात आले.

या किट्समध्ये पूरग्रस्त कुटुंबांना आवश्यक असणाऱ्या अन्नधान्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता साहित्य यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता. या मदतीमुळे गावकऱ्यांना दिलासा मिळाला असून, तौरल इंडियाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भरत गीते यांनी समाधान व्यक्त करताना सांगितले की, मराठवाड्यातील शेतकरी राजा आणि नागरिकांना या संकटाच्या काळात साथ देणं ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. काहीही झालं तरी आम्ही आपल्या सोबत आहोत आणि मराठवाडा पुन्हा नव्या जोमाने उभा राहील, याची मला पूर्ण खात्री आहे.या समाजोपयोगी उपक्रमामुळे बीडमधील पूरग्रस्तांना तातडीचा दिलासा मिळाला असून, तौरल इंडिया कंपनीने सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी एक दिवसांचे वेतन

## महसूल व जिल्हा परिषद अधिकारी- कर्मचारी यांचा निर्णय

नांदेड :- ऑगस्ट व सप्टेंबर २०२५ महिन्यातील भीषण पुरामुळे नांदेड जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे व शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाला केले होते.

या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातील महाराष्ट्र राज्य तहसिलदार, नायब तहसिलदार संघटना (जिल्हा नांदेड), महाराष्ट्र राज्य तलाठी संघ (राज्यस्तरावरून) तसेच महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना (जिल्हा) यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी आपला एक दिवसाचा वेतन शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच जिल्हा परिषद, नांदेड येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनीही जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत बाधितांना मदत म्हणून एक दिवसाचे वेतन शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देण्याचा निर्णय घेतला आहे.सदर जमा होणारा निधी मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये जमा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी दिली आहे.

# आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन स्थगित

संभाजीनगर /प्रतिनिधी

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीमुळे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन स्थगित करण्यात आलेले आहे .

पुढील शिबिराची तारीख परिस्थिती व्यवस्थित झाल्यानंतर आयोजनाची बैठक घेऊन नंतर कळविण्यात येणार येईल. शिबिर आयोजन रद्द करण्यात आले आहे अशी माहिती आयोजक पी.जी. गुजर यांनी दिली.अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

# जिल्हा रुग्णालय जालना येथे स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत सर्वरोग निदान व रक्तदान शिबीर

## ३० सप्टेंबर- डॉ.राजेंद्र गाडेकर यांचे आवाहन

जालना /प्रतिनिधी :- दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा रुग्णालय जालना येथे 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियान अंतर्गत सर्वरोग निदान शिबीर आणि रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.या शिबिराचा उद्देश सर्व वयोगटातील नागरिकांच्या आरोग्याची दक्षता घेणे, आवश्यक



तपासण्या करणे आणि आरोग्य सेवांशी जोडणी करणे असा आहे.किशोरवयीन मुलं-मुली, महिला व पुरुषांसाठी तपासण्या व उपचार रक्त तपासणी, हिमोग्लोबिन, बीपी, शुगर महिलांचे आजार आणि कॅन्सर तपासणी हाडांच्या तक्रारींसाठी तपासणी आरोग्य सेवा व नोंदणी

आभा कार्ड व आयुष्यमान कार्ड नोंदणी आवश्यक उपचार आणि संदर्भ सेवा रक्तदान शिबीर इच्छुक नागरिकांनी या शिबिरामध्ये रक्तदान करून जीवन वाचविण्याचा महत्त्वाचा सहभाग घेता येईल. मा. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील आणि अति जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, जास्तीत जास्त लोकांनी या शिबिराचा लाभ घ्या आणि आपल्या व कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घ्या.

# गोदे काठावरील गेवराई तालुक्यातील गावे स्थलांतरित

गेवराई /प्रतिनिधी

सावळेश्वर, पांचाळेश्वर, बोरगाव, गुळज, नागझरी, हिंगणगाव, गोंदी, कटचिंचोली, पांगूळगाव, राजापूर, रामपुरी, गोपत पिंपळगाव, श्रीपत अंतरवाला, इत्यादी नदीकाठावरील गावातील संभाव्य पूर्ण क्षेत्रातील नागरिकांचे स्थलांतर करून त्यांची व्यवस्था शाळा जिनिंग आदी ठिकाणी करण्यात आली आहे.सुमारे ५०० ते ६०० व्यक्तींचे स्थलांतर केले आहे.

गोदी खुर्द पूरग्रस्थाची राहण्याची सोय ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच विठ्ठल मंदिरात केली आहे.

हिंगणगाव मध्ये सध्या सामान्य परिस्थिती आहे..४,५ कुटुंबांनी गावातील त्यांच्या पाहुण्याकड राहणार आहेत अस कळवल आहे.संगम जळगाव- सध्या सामान्य परिस्थिती आहे. गुरे सुरक्षित स्थळी हलवण्यात आली आहेत.जर परिस्थिती बिकट झाल्यास रेवकी येथील शाळेत सोय केली आहे. जुने बोरगांव बू. येथील नागरिकांना स्टलांतरीत करण्यासाठी कॅम्प बोरगांव जि प शाळा व बरड बोरगांव येथे जी प शाळा येथे येवस्था करण्यात आली आहे. गुळज येथील स्थलांतरित नागरिकांसाठी भगवान



नगर येथील जिल्हा परिषद शाळा येथे व्यवस्था करण्यात आली. मौजे नागझरी (महसूल मंडळ रेवकी ) येथील गावकरी यांची स्थलंतरित करून जायकवाडी वसाहत येथील भगवान बाबा माध्यमिक विद्यालय येथे व्यवस्था करण्यात आली आहे. मौजे सावळेश्वर येथील जिनिंग वर लोक स्थलांतरित केले आहे.मौजे संगम जळगाव येथील नागरिकांची व्यवस्था खंडूबाबा माध्यमिक विद्यालय, रेवकी या ठिकाणी करण्यात आली आहे.गंगावाडी (राहेरी) , भोगलगांव येथील ग्रामस्थ यांना तलवाडा येथे शाळेत स्थलांतरीत करण्यात येत आहे.

# केज येथे वसंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेची सर्व साधारण सभा संपन्न

केज/प्रतिनिधी

केज शहरातील वसंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पत संस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झाली.याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. रमेशराव आडसकर साहेब,रणजीत भैया आडसकर,प्राचार्य श्री. फावडे सर,चेअरमन श्री.सुरेश शिनगारे सर सचिव श्री.बालासाहेब घुगे सर व सर्व संचालक मंडळ हे होते.यावेळी सर्वप्रथम संस्थेच्या दिवंगत सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.नंतर सरस्वतीचे पूजन करून संस्थेचे प्रेरणास्थान लोकनेते स्व.बाबुरावजी आडसकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.पूर्ण राज्यामध्ये पावसाने शेतकऱ्यांच्या जीवनात भयाण परिस्थिती निर्माण केली असल्याने कसलाही स्वागत सत्काराचा कार्यक्रम रमेशरावजी आडसकर साहेब यांच्या सूचनेनुसार घेण्यात




आला नाही.याप्रसंगी बोलताना श्री.रमेशराव आडसकर साहेब यांनी सांगितले की, निसर्ग शेतकऱ्यावर कोपला आहे.जगाचा पोशिंदा संकटात आहे,आपणा सर्वांचे कर्तव्य आहे की प्रत्येकाने आपल्यापरीने मदत करावी.वसंत पत संस्थेच्या वतीनेही भरीव व मोठी मदत करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

याप्रसंगी एमबीबीएस व आयआयटी मध्ये निवड झालेल्या सभासद पाल्यांचा तसेच चालू काळामध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा ही सन्मान याप्रसंगी त्यांनी केला.तसेच अल्पावधीमध्ये वसंत पतसंस्थेने मिळवलेल्या यशाबद्दल त्यांनीकौतुक केले व सभासदांनी जास्तीत जास्त ठेवी आपल्या पतसंस्थेत ठेवाव्यात अशाही सूचना केल्या.याप्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन श्री.शिनगारे सुरेश यांनी पतसंस्थेच्या चालू वर्षाचा ताळेबंद सभासद व उपस्थिता समोर ठेवला हे सांगताना अत्यंत चिकाटीने कारभार करत ९१लाख रुपयाचा नफा चालू वर्षात पत संस्थेने मिळाल्याचे त्यांनी सांगितले.तसेच सर्व सभासदांना १३ टक्के दराने लाभांश देण्याचे टाळ्याच्या गजरात घोषित केले.

याप्रसंगी मा.चेअरमन श्री.शाहूराव साखरे सर यांनीही आपले विचार मांडले.वसंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत खेळी मेळीच्या वातावरणात पार पडली.याप्रसंगी सर्व शाखेचे प्राचार्य, मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाचा समारोप पतसंस्थेचे सचिव श्री.बालासाहेब घुगे सर यांनी केला व कार्यक्रम संपन्न झाला.

# दूध उत्पादकांनी भ्रूण प्रत्यारोपण या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्पादकता वाढवावी - आ.सुरेश धस

आष्टी - (प्रतिनिधी) दूध उत्पादक शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून भ्रूण प्रत्यारोपण या नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याच गोठ्यात नवीन प्रजाती निर्माण करून जास्तीत जास्त दूध उत्पादन होईल यासाठी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले.

तसेच महाराष्ट्रातील तरुण दूध उत्पादन व्यवसायाकडे येत आहेत परंतु त्यांनी सोशल मीडियावरील माहितीवरून परराज्यातून गाई म्हशींच्या बाबत या माहिती आधारे आर्थिक गुंतवणूक करू नये त्यातून फसवणूक होण्याचे अनेक उदाहरणे घडली आहेत त्यामुळे त्यांनी सजग राहून फसवणूक टाळावी असे आवाहन कोल्हापूर येथील वाय. टी. पाटील डेअरी फार्म चे संचालक अरविंद पाटील यांनी केले. आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ यांचे वतीने आयोजित दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करताना आमदार सुरेश धस आणि अरविंद पाटील बोलत होते.

यावेळी प्रास्ताविक डॉ. जालिंदर वांढरे, डॉ. मंगेश ढेरे पशुधन विकास अधिकारी यांनी केले. यासह पशु प्रजननातील अद्यावत तंत्रज्ञान, भ्रूण प्रत्यारोपण याबाबत डॉ. विष्णू जवणे (पशुधन विकास अधिकारी पुणे) यांनी उपस्थित पशुपालक यांना मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर चेअरमन शांतीलाल भोसले, तालुका दुध उत्पादक संघ, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, आत्माराम फुंदे, शिवाजी घोलप, यांचेसह दूध संघाचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी कार्यकारी संचालक मच्छिंद्र धनवडे, मोहन झांबरे, दिनकर दाणी व संघ कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले परिश्रम घेतले.

पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, आष्टी मतदार संघात या पूर्वी दूध व्यवसाय कमी प्रमाणात होता परंतु आष्टी तालुका दूध संघाच्या योग्य धोरण व सकारात्मक निर्णयामुळे आज आष्टी तालुका दोन लाख लिटर्स पेक्षा जास्त दूध उत्पादन करण्यामध्ये अग्रेसर झालेला असून तालुक्यातील शेतकरी नवनवीन गाई व म्हशींच्या प्रजातीचे पालन करत जास्तीत जास्त




दूध उत्पादन करण्याकरिता वेगवेगळ्या प्रयोग करत आहेत, त्याचबरोबर सर्व शेतकऱ्यांनी गाई व म्हशींची प्रजननातील अद्यावत तंत्रज्ञान सेक्स सोर्टेड सिमेन्स (भ्रूण प्रत्यारोपण) या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या गाई व म्हशींची दूध उत्पादकता वाढवावी यासह दूध उत्पादकता वाढवण्याबरोबरच ब्रीडिंग मॅनेजमेंट करून नवीन प्रजातीच्या गाई निर्माण करणे आवश्यकता आहे. त्यासाठी पशूला मुरघास याचबरोबर ओला -चारा व मॉइश्चर मिक्सर यासह शुद्ध पाणी व वेळेवरती औषध उपचार या सर्व बाबी महत्त्वाच्या आहेत त्याकरिता सर्व शेतकऱ्यांनी जागरूक व सजत राहणे आवश्यक आहे यासह येणाऱ्या काही काळामध्ये ब्रीडिंग व डेअरी फार्म च्या माध्यमातून मतदार संघामध्ये महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवून नवतरुणांना या क्षेत्रामध्ये आकर्षित करून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मनुष्यबळ कमी वापरून जास्तीत जास्त आर्थिक फायदा शेतकऱ्यांना व पशुपालकांसह नव तरुणांना फायदा होईल याकरिता सकारात्मक धोरण घेण्याचे सांगितले.



# भालगाव येथील ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश

केज/प्रतिनिधी

खा.बजरंग सोनवणे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन भालगाव ता.केज येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहेपक्षाच्या विचारसरणी वर श्रद्धा,जनतेचा विश्वास आणि विकासाची दिशा यांवर विश्वास ठेवून झालेल्या या प्रवेशामुळे पक्ष संघटन अधिक बळकट झाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या प्रवेशामुळे केज तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची ताकद अधिक वाढली असून कार्यकर्त्यां मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांची नावे अब्दुल सिराज तांबोळी,भगवान शिवचंद्र गिरी,शिवहार गुरलिंग विभुते,लायक बाशुमियाँ शेख,जब्बार बालुमियाँ शेख,तय्यब बशीर पठाण,कलिम तासौदिन शेख,हकिम तासोदिन शेख,मसुद इस्माईल शेख,मिया ननौमियाँ शेख,हरीभाऊ शिवचंद गिरी,सुनिल लक्ष्मण सिरसाठ,मयूर उत्तमराव सुरवसे, महादेव बळीराम मोरे आदि उपस्थित होते.







हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अ‍ॅण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना इतर कारखान्याच्या बरोबरीने ऊसाला भाव देणार

## चेअरमन रमेशराव आडसकर यांनी ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सांगितले




अंबाजोगाई (प्रतिनिधी) अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सभासद, उसउत्पादक, याच्या प्रमुख उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरण संपन्न झाली

अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना ली आंबा साखर, तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड च्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अहवाल वाचन चेअरमन रमेशराव आडसकर यांनी तर विषय वाचन कार्यकारी संचालक डी एन मरकड यांनी केले.

अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या ४८ व्या वार्षिक सभेचे अहवाल वाचन करताना चेअरमन रमेशराव आडसकर म्हणाले कि,कारखान्यास यावर्षी पन्नास वर्षे पूर्ण होत असून मागील पन्नास वर्षांमध्ये या कारखान्याचे अनेक चढउतार आपण पहिले आहेत तसेच अनेक अडचणींना आपण सामोरे गेलेलो आहोत. या कारखान्याचे संस्थापक मा. श्री ज्ञानोबारावजी पाटील व संस्थापक माजी आमदार मा. श्री बाबुरावजी आडसकर साहेब यांनी लावलेल्या या सहकाराच्या रोपट्यामुळे सहकारी चळवळीला बळकटी मिळाली तसेच या सहकारी साखर कारखान्यामुळे परिसराच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत झाली साखर कारखानदारी दर तीन ते चार वर्षात दुष्काळात सामोरे जाते. तसेच गाळपास सातत्य राहत नाही व हा उद्योग हंगामी चालत असल्यामुळे वेळोवेळी कारखानदारी समोर आर्थिक अडचणी उभ्या राहिलेल्या आहेत. अशा परिस्थितीमध्ये सहकारी साखर कारखाना टिकला पाहिजे व सहकारी चळवळीला बळकटी मिळाली पाहिजे म्हणून हा कारखाना चालू राहावा यासाठी माझे प्रामाणिक प्रयत्न राहिलेले आहेत

. . हा कारखाना टिकला पाहिजे व सहकारी चळवळीला बळकटी मिळाली पाहिजे याच उदास हेतूने माझी सर्व राजकीय प्रतिष्ठा पनाला लावून राज्यशासना मार्फत राष्ट्रीय सहकार विकास निगम नवी दिल्ली. याच्याकडून खेळत्या भांडवलासाठी मार्जिन मनी लोन रुपये ८० कोटी मंजूर करून घेतले आहे. बीड जिल्हा सहकारी बँक, सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक ,सांगली. शुगरकेन डेव्हलपमेंट फंड नवी दिल्ली या संस्थेचे एक रकमी परत फेडीनुसार थकित देणे देण्यात आले. तसेच थकीत तोडणी वाहतूक, थकीत प्रॉव्हिडंट फंड व महावितरण ची थकलेली रक्कम या सर्व रकमा कारखान्याने अदा केल्यामुळेच व उर्वरित रकमेचा उपयोग कारखान्याची जुनी झालेली प्लांट व मशिनरीचे देखभाल दुरुस्ती व काही प्रमाणात मशिनरीचे आधुनिकीकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे रुपये ८० कोटी कर्जाचा विनियोग अत्यंत काटकसरीने व योग्य पद्धतीने करण्यात आलेला आहे.

येणाऱ्या गळीत हंगाम २०२५- २६ मध्ये चार लाख मॅट्रिक टन ते साडेचार लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवून त्याप्रमाणे नियोजन करण्यात आलेले असून, कारखाना अत्यंत कार्यक्षमतेने चालणार आहे. कारखान्याकडे असणारी ३० के एल पी.डी असवानी प्रकल्पातील आपण रेक्टिफाइड स्पिरिट चे उत्पादन घेत होतो, मात्र यापुढे आपण इथेनॉल निर्मिती करण्याचा निर्णय आमच्या संचालक मंडळाने घेतलेला आहे. त्यामुळे काही प्रमाणात कारखान्याला आर्थिक फायदा होणार आहे. कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये उसाचे उत्पादन वाढीसाठी यापुढे प्रयत्न करणार असून कृतीम बुद्धिमतेचा वापर करून परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस उत्पादन वाढीचा फायदा होणार आहे. त्यामुळे यापुढे हा कारखाना सक्षमपणे चालवणार आहोत व उपपदार्थ निर्मितीवर भर देणार आहोत असे चेअरमन रमेशराव आडसकर यांनी सांगितले.ते पुढे बोलताना म्हणाले कि, हा आंबा कारखाना सलग तीन वर्ष साडे चार ते पाच लाख मॅट्रिक टन ऊसाचे गाळप झाले तर कारखाना नक्कीच कर्जमुक्त होईल व कारखान्याला गतवैभव प्राप्त होईल असे त्यानी सांगितले.

याप्रसंगी व्हाइस चेअरमन मा श्री दताऱ्य (अबा) पाटील वार्षिक सभेत सभासदांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, यावर्षी हा कारखाना ईतर कारखान्याच्या बरोबरीने भाव देणार असुन सर्व शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस गाळपासाठी देण्याचे आवाहन केले.असुन विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर बॉयलर अग्नी प्रदिपन होणार असल्याचे त्यांनी सांगितले.या वार्षिक सभेसाठी प्रामुख्याने सर्व श्री संचालक ऍड प्रमोद जाधव, ऋषिकेश आडसकर, संभाजी इंगळे, लक्ष्मीकांत लाड, अशोक गायकवाड, गोविंद देशमुख, राजेभाऊ औताडे, विजय शिंनगारे, बालासाहेब सोळंके, मधुकर शेरेकर, अनिल कीर्तन, जीवनराव कदम, लालासाहेब जगताप, अनंत कातळे, विठ्ठलराव देशमुख, शशिकांत लोमटे, मिनाज पठाण, रमाकांत पिंगळे, सुरेश साखरे, कार्यकारी संचालक दत्तात्रय मरकड, चीफ अकाउंटंट सुरेश बोराटे, वर्क्स मॅनेजर धीरज वाघोले, मुख्य शेतकी अधिकारी सचिन बागल,चिफ केमिस्ट केशव पाटील,ऊस पुरवठा अधिकारी आनंद शिंदे, चीफ इजिनिअर प्रशांत सोनार, डिस्टलरी इन्चार्ज प्रकाश साळुंखे यांच्यासह सेवा सह सोसायटी आडसचे चेअरमन उध्दवराव इंगोले, धारूर कृषी उत्पन्न बाजार समीतीचे संचालक भारतराव सोळंके व विजयकुमार खुळे, खडूस चे सरपंच रामधन लाखे, यांच्यासह सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, मुकदम ठेकेदार,कारखान्यातील कामगार बहुसंख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसरडोहचे सरपंच रवी देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन संनगाव सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन पांडुरंग अंजान सर यांनी केले आणि वार्षिक सभा सुरळीत व नियोजनबध्द करण्यासाठी अनिल माचवे सर यांनी विशेष प्रयत्न केले.

# माय बाप सरकार शेतकऱ्यांची पुरात पीके, जनावरे गेली आता काय शेतकरी मरायची वाट पाहताय काय?

लबाड पुढाऱ्यांनो नुकसान भरपाईचे घोडे कुठे आडले ते शेतकऱ्यांना नुकसानभरपाई कधी मिळणार ?

अनंत जाधव /मस्साजोग

बीड जिल्ह्यासह संपूर्ण

मराठवाड्यावर निसर्ग कोपला आहे. त्यामुळेच जिल्ह्यात धो धो पाऊस कोसळत आहे. या धो धो पडणाऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील सगळीकडे पाणीच पाणी पहायला मिळत आहे.गावा गावांचा संपर्क तुटल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. जिल्ह्यावर अतिवृष्टीचे संकट कायम असून

माजलगाव, मांजरा, बिंदुसरा यासारखी जिल्ह्यातील छोटी ,मोठी धरणे ओव्हरफ्लो झाली आहेत. तसेच या पावसामुळे नद्यांना महापुर येत असल्यामुळे गावागावात पाणी शिरल्याचेही चित्र पहायला मिळत आहे. दि.२७ रोजी झालेल्या पावसामुळे अर्धे बीड पाण्यात गेले . धो धो कोसळणाऱ्या या पावसामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह ,नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊन पीकांचे मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे.माय बाप सरकार शेतकऱ्यांची पुरात पीके, जनावरे गेली आता काय शेतकरी मरायची वाट पाहताय काय?

पिकांच्या पाहण्या झाल्या,मदतीचे आश्वासने झाली मग

नुकसान भरपाईचे घोडे कुठे आडले ते शेतकऱ्यांना कळेना ?असा संताप जनकसवाल शेतकऱ्यांमध्ये उपस्थित होत आहे. जिल्ह्यातील पिंपळादेवी गावांमध्ये पाणी शिरून मसानवाटा पाण्यात गेल्याने वृद्ध महिलेचा अंत्यसंस्कार कुठे करायचा ? असा उपस्थित होतो तर दुसरीकडे केज तालुक्यातील मांजरा नदीकाठी असलेल्या दैठणा (ता. केज) गावातील एका शेतकऱ्याचा ऊस, सोयाबीन पीक हाता तोंडाशी आलेले पीक गेल्याने शेतकऱ्यांचा धीर खचल्याने ओढ्याच्या पुरात उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र एका शेतकऱ्यांने समयसूचकता दाखवीत त्याला धरून उडी मारू न दिल्याने शेतकऱ्यांचा जीव वाचला आणि हा अनर्थ टळला.

गेल्या आठवड्यापासून जिल्हासह केज तालुक्यात सुरू असलेल्या सततच्या मुसळधार पावसाने शेतातील पिके जाग्यावर सडून गेली तर काही जमीन दोस्त झाली असून शेतात केलेला खर्च आता कसा निघणार आणि खिशात पैसा नसल्याने घरचा संसार कसा चालणार असे अनेक प्रश्न निर्माण झाल्याने

खंडू हरिचंद्र मुळे या शेतकऱ्याच्या शेतातील ऊस, सोयाबीन पिकात पाणी शिरल्याने या शेतकऱ्यांचे मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे. पेरणी आणि खत, औषधी यासह मशागतीसाठी झालेले कर्ज आणि

मेहनत वाया गेल्याने आता अंगावर झालेले कर्ज कसे फेडणार ? या विचाराने खचून खंडू मुळे या शेतकऱ्याने २७ सप्टेंबर रोजी दुपारी नाव्होलीकडून दैठण्याकडे वाहत आलेल्या पुराच्या पाण्यात उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. तरी देखील माय बाप सरकारला जाग येत नसेल तर हे दुर्दैव म्हणावे लागेल.शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना निवडणुकी प्रमाणे कर्ज माफी आणि मदतीची पोकळ आश्वासने द्यायला जमतात तर नुकसान भरपाई द्यायला सरकारला का जमत नाही असा सवाल देखील शेतकऱ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे .त्यामुळे शेतकऱ्यांने मरावे की जगावं हे केज तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कळेना झालंय तरी मायबाप सरकारने आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब,उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी दीपावलीच्या पुर्वसंध्येला शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या पीकांचे नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांचे तोंड गोड करण्याची मागणी केज तालुक्यातील,जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिकांकडून होत आहे.

नाम फाउंडेशन शेतकऱ्यांच्या मदतीला सरसावले मात्र सरकार अजूनही ठप्पच.

विलास बडे आणि विविध माध्यमांनी केलेल्या प्रसारित केलेल्या बातम्या आणि नुकसानीचे वास्तव दाखवून मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या पीकांच्या नुकसानीचे परिस्थिती महाराष्ट्रासमोर आणल्यानंतर, नाम फाऊंडेशनचे सर्वेसर्वा ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांनी न्यूज १८चे वृत्त निवेदक विलास बडे यांच्याशी संवाद साधून, मदतीसाठी हात पुढे केला. पुरग्रस्त गावांना नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे हे पाणी फाऊंडेशनच्या



माध्यमातून मदत करणार आहेत.सामाजिक क्षेत्रातील लोकांना बळीराजाच्या नुकसानीचे जान आहे मात्र सरकार मात्र फक्त पोकळ आश्वासने देण्यात दंग आहे तरी सरकार कधी मदतीसाठी सरसावणार? असा सवाल देखील यावेळी उपस्थित होत आहे.केज तालुक्यातील बेलगाव या गावाचा शुक्रवार पासून संपर्क तुटला आहे . त्यामूळे पात्रावून जाणारा रस्ता बंद झाला आहे. पाण्याचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे.गेली तब्बल आठ दिवसांपासुन सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे .गावात आरोग्य उपाययोजना नसल्यामुळे एखाद्या गावातील नागरिक आजारी पडला तरीही या पुलावरून जाता येत नाही . पुलावरील पाणी ओसरत नसल्याने गावातील नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.सोयाबीन पिकाचे भरपूर नुकसान झाले आहे .शेतकरी अंतिम संकटात आहे त्यामुळे प्रशासनाने या नुकसानीचे तात्काळ द्यावी. अक्षय अशोक दातार,शेतकरी बेलगाव ता. केज.

## नियोजन नसल्याने बीड शहरात रस्त्यावर आणि घरात पाणी पाहणी करणाऱ्या नेत्यांना जनतेने प्रश्न विचारावेत –ॲड. अजित देशमुख

बीड (प्रतिनिधी) बीड शहरात यावर्षी पावसाळ्याने अनेक रस्ते बंद केले आहेत. त्याचप्रमाणे शहरातील अनेक भागातील गल्ली बोळातील घरामध्ये पाणी शिरले आहे. नियोजनाचा अभाव यातून प्रामुख्याने दिसून येत आहे. नदी आणि नाल्यांचे पात्र लहान करणे, नियमाप्रमाणे रस्ते न सोडणे, अशा गैरप्रकारांना सत्ताधाऱ्यांनी खत पाणी घालणे, केवळ याचा परिणाम जनतेला भोगावा लागत आहे. त्यामुळे पाहणी करण्यासाठी आलेल्या वर्षानुवर्षी सत्ता उपभोगलेल्या नेत्यांना जनतेने प्रश्न विचारावेत, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम .देशमुख यांनी केले आहे.

बीड शहरात कोणकोणत्या भागात पाणी आलेले आहे, याचे अनेक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर दिसत आहेत. अनेक रस्ते जलमय झाले आहेत. लोकांना घरातून बाहेर पडणे देखील मुश्किल झाले आहे. याला जे जबाबदार आहेत, त्यांना जनतेने प्रश्न विचारले पाहिजेत. जनतेने त्यांच्या दारात जाऊन सत्तेचा उपभोग कसा घेतला, याबाबत विचारायला हवे.शहरातील अनेक नदी नाले यांना नाल्यांचे स्वरूप आणले गेले आहे. यातून बेकायदेशीर रितीने लहान लहान रस्ते सोडून नगरपालिकेच्या कृपेने बांधकाम झालेले आहे. नगर पालिकेतील भ्रष्ट कारभार आणि वेगवेगळ्या ठिकाणी जागा गिळंकृत करणे, यासारख्या उद्योगांचे परिणाम आता जनतेला भोगावे लागत आहेत. अशातच आता वर्षानुवर्षी सत्ता भोगणारे अनेक जण जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी पाण्यात जात असल्याचे चित्र पाहिल्यानंतर त्यांची किव येते. जनतेने वर्षानुवर्ष सत्ता उपभोग करणाऱ्यांना या काळात गल्ली बोळात आल्यानंतर प्रश्न विचारून त्याचे व्हिडिओ व्हायरल करणे आवश्यक आहे. जोपर्यंत शहरातील जनता जागृत होत नाही, तोपर्यंत या समस्या सुटणार नाहीत. त्यामुळे विकासाच्या गाथा गाणाऱ्यांना भूतलावर आणून जनतेच्या अडचणी दाखवल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे गल्ली बोळातील नागरिकांनी विकास पुरुषांच्या घरी जाऊन त्यांनी नियोजन काय केले ? याबाबत स्पष्ट विचारणा करायला हवी. जनता नगर पालिकेला टॅक्स देते. जनतेला सुविधा पुरवणे हे नगर पालिकेचे काम आहे. त्यामुळे सुविधा मिळत नसतील, तर त्याविषयी देखील जनतेने आवाज उठवावा,

## शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी – प्रा. बबन आंधळे

बीड /प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यामधील सर्व तालुक्यामध्ये शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.पिकाची पूर्णपणे नासधुस झाली आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी या पार्श्वभूमीवर ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. बबनराव आंधळे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे बीड जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांना बरोबर घेऊन निवेदन देण्याचे ठरवले आहे.



या निवेदनामध्ये शासनाने ओला दुष्काळ त्वरित जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालेली आहे. शेतामध्ये पूर्णपणे पाणी साचले आहे कापूस, तूर, सोयाबीन यासह अनेक पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच फळ बागाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.शेतकऱ्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केलीआहे

## शिरूर मध्ये पूरग्रस्ताना मुस्लिम समाजाच्या वतीने जिवनावश्यक वस्तूचे वाटप

मानूर /प्रतिनीधी ह्न

शिरूर शहरामध्ये पूरग्रस्त कुटुंबांना मुस्लिम समाजाच्या वतीने जिवनावश्यक वस्तू वाटप करून त्यांच्या अडचणीच्या काळात आम्ही आपल्या सोबत आहोत असा संदेश दिला.

तालुक्यात मोठ्या प्रमाणात होत असलेल्या पावसामुळे सिंदफणा नदीला अनपेक्षित पूर आला, अनेकांचे राहते घर,दुकान वाहून गेले. अशा संकटकाळी माणुसकी धर्म पाळत शहरातील मुस्लिम बांधवांनी पूरग्रस्तांना आधार देण्याचा प्रयत्न करत किराणा सामान व जिवनावश्यक वस्तूंचे वाटप केले आहे. यावेळी मरकज मशीदचे इमाम हाफीज अब्दुल जब्बार पठाण,अमीरसाहेब जब्बार पठाण,फयाजभाई शेख,जमीर जीलानी बागवान, सत्तार शेख,शमशुद्दिन शेख, अन्वर पठाण,इजारोद्दीन इनामदार,कौसर(मुन्ना)शेख, मुबारक शेख,महंमद शेख,बाबा कुरेशी,लायक शेख,कादर शेख,रफिक शेख, सोहेल पठाण,सलमान,साद,आसीम,आसिफ



## जोला गावावर आलेले अस्मानी संकट तलाठी रविंद्र गायकवाड यांच्या सतर्कतेने टळले

केज/प्रतिनिधी

शनिवार दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी केज तालुक्यातील जोला शिवारातील रक्ताळीचा माळ परिसरातील पाझर तलावाच्या भिंती वरुन पाणी वाहत असल्याचे गावकऱ्यांच्या निदर्शनास आले आता तलाव फुटणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती.शुक्रवार दि. २६ सप्टेंबर रोजी दुपारी सुरू झालेला जोरदार पाऊस शनिवार पर्यंत सुरूच होता यामुळे रक्ताळीचा माळ शेतातील पाझर तलाव तुडुंब भरूनफुटण्याच्या मार्गावर आहे हि बाब नागरिकांच्या लक्षात येताच सदरील माहिती गोविंद नवनाथ ढाकणे, भगवान करंजकर व आसाराम ढाकणे यांनी जोला तलाठी सज्जाचे तलाठी रविंद्र गायकवाड यांना दिली. सदरची माहिती मिळताच गायकवाड यांनी जोला गावातील तलावाकडे धाव घेऊन तातडीने तलावाचा सांडवा फोडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले स्वतः हातात टिकाव घेऊन खोदण्यासाठी सुरवात केली त्यांच्या मदतीला गोविंद ढाकणे,आसाराम ढाकणे,गोविंद सारुक व बाळासाहेब बिक्कड होते परंतु माणसांच्या हाताने धोका टळला पण संपूर्ण सांडवा फोडणे शक्य नाही असे लक्षात येताच मुरली बप्पा ढाकणे यांनी जेसिबी मशिन बोलावुन घेत तब्बल सात तास मशिन चालवुन सांडवा खोल करून घेत मौजे जोला गावावरील व परिसरावरील मोठा धोका तलाठी रविंद्र गायकवाड यांच्या सतर्कतेमुळे टळला आहे.ही संपूर्ण मोहीम तलाठी रविंद्र गायकवाड,भगवान सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष मुरलीधर बप्पा ढाकणे, महसूल सहाय्यक बाळासाहेब बिक्कड, गोविंद ढाकणे,अशोक जेधे,आसाराम ढाकणे, अविनाश सारुक, सखाराम ढाकणे, भगवान करंजकर, गणेश ढाकणे,गोविंद सारुक,रामेश्वर ढाकणे, विनायक ढाकणे, ज्योतीराम ढाकणे, तुकाराम सारुक यांच्या सह गावकरी यांनी यशस्वी केली आहे.



# देविदास धस यांच्या प्रेरणेतून व आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनखाली पतसंस्थेची यशस्वी वाटचाल – विठ्ठल शेंबडे



आष्टी – (प्रतिनिधी) जेष्ठ नेते तथा मा. जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस यांच्या प्रेरणेतून व आ. सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनखाली साईनाथ सहकारी वीज कर्मचारी पतसंस्थेची यशस्वी वाटचाल चालू आहे.

पतसंस्थेची वार्षिक सभा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्याने सर्व सदस्यांची ऑनलाइन मिटिंग घेऊन सभा पार पडली अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल शेंबडे यांनी दिली.

यावेळी साईनाथ विज सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित कडा, ता. आष्टी, जि. बीड या पतसंस्थेचे अध्यक्ष विठ्ठल विश्वनाथ शेंबडे, उपाध्यक्ष रमेश गोविंद बनसोडे, मानद सचिव शाकीर इब्राहिम शेख, तज्ञ संचालक अमृत संभाजी आजबे, महेश महादेव घोडके, अमोल भीमराव कर्डिले, अशोक रावसाहेब काकडे, बापूराव नवनाथ क–हे, आश्विन मनोहर मंडळे, श्रीमती निर्मला अर्जुन गळघटे, श्रीमती उषा भाऊसाहेब जगदाळे, सय्यद बाशीद अहमद आदी उपस्थित होते. विद्यमान आमदार लोकनेते सुरेश आण्णा धस, माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब, माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, माजी आमदार बाळासाहेब आजबे काका आदींचा या पतसंस्थेला मोठे सहकार्य लाभले आहे असे अध्यक्ष विठ्ठल शेंबडे यांनी सांगितले. याप्रसंगी पतसंस्थेमध्ये श्रीरंग आप्पा कर्डिले, भाऊसाहेब निंबाळकर, प्रशांत पोकळे, शिवाजी गोरे शहाजी कर्डिले, शिवा मार्कंडे, मन्सूर सय्यद, कोकाटे आदी उपस्थित होते.

# केज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांची उपस्थिती,

## अतिवृष्टीमुळे सत्कार स्वीकारला नाही

केज/प्रतिनिधी

केज कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात व सुस्थितीत पार पडली. या सभेस जेष्ठ नेते तथा सर्वसामान्यांचे लढवय्ये संवेदनशील नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे रमेशरावजी आडसकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.सभेच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री. अंकुशराव इंगळे होते. तर उप सभापती डॉ. वासुदेव नेहरकर,जिल्हा भाजपा सचिव सुनील आबा गलांडे,भाजपा तालुकाध्यक्ष भगवान केदार,माजी सभापती लक्ष्मीकांत लाड, संचालक अरुण धपाटे, राजेश आगे, पशुपतीनाथ पाटील, तसेच सचिव संतोष देशमुख सर्व व्यापारी व समितीचे कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सभेत मागील वर्षातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला.शेतकरी व व्यापाऱ्यांच्या अडी अडचणी,बाजारातील




सुविधा,नवीन योजना, तरतुदी व आर्थिक अहवाल यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी समितीच्या विकासात्मक योजना, बाजारपेठेतील दर स्थिरता व शेतकरी व्यापारी यांच्यातील समन्वय वाढवण्यासाठी ठराव करण्यात आले.

सभेत बोलताना जेष्ठ नेते रमेशरावजी आडसकर यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याचे कौतुक केले तसेच येत्या काळात शेतकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.सभापती अंकुशराव इंगळे यांनी समितीच्या कामकाजाचा आढावा सादर करत शेतकऱ्यां च्या हितासाठी नवीन उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी समितीच्या कार्यप्रणालीस शुभेच्छा दिल्या.सभेचेप्रास्ताविक व सूत्र संचालन सचिव संतोष देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर यांनी मानले.या वार्षिक सर्वसाधारण सभेमुळे शेतकरी,व्यापारी व समिती यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ होऊन कृषीविकासाच्या दिशेने नवे पाऊल टाकले गेले असे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून याअस्मानी संकटातून शेतकरी सावरला जावा यासाठी रमेशराव आडसकर सतत प्रयत्नशील आहेत.संवेदनशील व्यक्तीमत्व असणाऱ्या रमेशराव आडसकर यांनी सत्कार स्वीकारला नाही

# जलप्रलयाने खचून जाऊ नका, या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासन, प्रशासन आणि आम्ही खंबीर – डॉक्टर योगेश क्षीरसागर

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील पूरग्रस्त भागातील नागरिकांच्या मदतकार्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुढाकार घेतला. रविवारी (दि. २८) त्यांनी धांडे नगर भागात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्याधिकारी शैलेश फडसे, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासोबत पाहणी केली. स्थानिक नागरिकांशी चर्चा करून उपाययोजना करण्याचे नियोजन केले.

त्यानंतर प्रकाश आंबेडकर नगर, नाळवंडी नाका, आदित्य कॉलेज परिसर, जुना मोंढा व मोंढा रोड या भागांचीही पाहणी करण्यात आली. शहरातील धांडे नगर परिसरातील मुख्य समस्या म्हणजे शहराजवळील खजाना विहिरीचा प्राचीन जलप्रवाह. या भागात लोकवस्ती उभारली जाताना बिल्डर्सकडून योग्य नियोजन न झाल्याने आजची परिस्थिती उद्भवली असल्याचे निदर्शनास आले. सध्या येथे तात्पुरत्या उपाययोजना करण्यात आल्या





असून, लवकरच कायमस्वरूपी उपाययोजनांवर काम सुरू होणार आहे.यानंतर प्रकाश आंबेडकर नगर भागात प्रत्यक्ष पाहणी करून मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या उपस्थितीत नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना कामे तत्काळ सुरू ठेवण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर बार्शी नाका परिसरातील गाडेकर वस्ती येथे भेट देऊन रस्ता व नाल्यांबाबत गंभीर समस्या असल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यावर डॉ. योगेश क्षीरसागर यांनी निधी उपलब्ध करून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले.तसेच, नाळवंडी नाका रोडलगत रस्ते व नाल्यांची स्वच्छता नगरपरिषदेकडून जेसीबीद्वारे सुरू करण्यात आली. जुना मोंढा भागातील पडझड झालेल्या घराची पाहणीही करण्यात आली. यावेळी स्थानिक पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंटचा प्रस्ताव दिला ना.अजितदादा पवारांकडे

बीड शहरातील मुख्य नाल्यांच्या संदर्भात स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंटचा प्रस्ताव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडे पाठविला होता. या प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांनी देखील चर्चा केली असून लवकरच तो मार्गी लागणार आहे. या प्रकल्पामुळे धांडे नगर, नवगण कॉलेज रोड, जालना रोड, कॅनॉल रोड आदी भागांमध्ये नाल्यामुळे रस्त्यावर साचणाऱ्या पाण्याची समस्या दूर होणार आहे.


### शासनाकडून राशनचे वाटप

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार घरात पाणी शिरलेल्या पूरग्रस्तांना राशन देण्यात येत आहे. शहरातील आदित्य कॉलेज परिसरात स्थलांतरित गांधी नगरमधील नागरिकांना नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर यांच्या हस्ते राशन वाटप करण्यात आले. यावेळी शेकडो नागरिकांना लाभ देण्यात आला. याप्रसंगी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

# आष्टीच्या खासबागेत २० वर्षापासून होतोय नवरात्र उत्सव साजरा

आष्टी – (प्रतिनिधी) आष्टी शहरातील खासबाग येथील स्व. बाळासाहेब धोंडे यांच्या पत्नी श्रीमती मैनाबाई धोंडे यांच्या नवसपूर्तीनिमित्त राशीन येथील यमाई देवीचे उपस्थान २० वर्षापुर्वी १० लाख रु. खर्चुन त्यांच्या तीन मुलांनी हे देवीचे मंदीर बांधले आहे.

दोन गुंठे जमीनीवर हे देवस्थान बांधले आहे. बाजार भावाने या जागेची लाखो रु. किंमत होते. गोकुळ बाळासाहेब धोंडे, साईनाथ बाळासाहेब धोंडे आणि दिपक बाळासाहेब धोंडे हे तीन भाऊ एकत्र कुटुंब पध्दतीने राहतात. आपल्या आईची भक्ती व श्रध्दा पुर्ण करण्यासाठी व नवसाच्या यमाई देवी मंदीर या



बांधवांने १६ वर्षांपूर्वी खासबाग परिसरात स्वताःच्या मालकीच्या जागेत हे मंदीर बांधले आहे. येथे गेली २० वर्षापासुन नवरात्र उत्सवात विद्युत रोशनाई, आराधी मेळा आयोजित केला जात आहे. येथील देवी मंदिरातील नवरात्रोत्सव कार्यक्रम अनेक वर्षापासुन सुरु आहेत. दरवर्षी या पवित्र भूमीत अध्यात्मिक क्षेत्रातील आराधीगीत आदी कार्यक्रमाने भाविक भक्तांना समाधान मिळते.

यंदाही येथे आरधीगीतांचा कार्यक्रम व ईतर सेवा संपन्न होत आहेत. आष्टी शहरातील विविध भागातील भाविक भक्त येथे उपस्थित राहतात आणि हजारों देवी भक्त दर्शनास येतात. या नवरात्र उत्सवाची मोठी उत्सुकता भक्तांमध्ये निर्माण झाली आहे. या नवरात्र उत्सवा निमित्त होणाऱ्या सर्व कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन देवीचे भक्त गोकुळ धोंडे यांनी केले आहे.

# विकसित भारत २०४७ संकल्पना साकार करण्यासाठी सामुदायिक प्रयत्नाची आवश्यकता –प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख

अंबड/प्रतिनिधी

विकसित भारत २०४७ ही भारत सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी संकल्पना असून ती साकार करण्यासाठी सर्व स्तरावर अगदी एका व्यक्तीपासून ते कुटुंब,खेडी शहरे, तालुका,जिल्हा,राज्य, राष्ट्र इत्यादी स्तरावर नियोजन करून त्या नुसार देशाच्या विकासा कडे वाटचाल करण्या साठी सामुदायिक प्रयत्नाची आवश्यकता आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष डॉ.आबासाहेब देशमुख यांनी केले.महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण मंत्री व माजी आरोग्य मंत्री आणि मत्स्योदरी शिक्षण संस्था,जालना चे अध्यक्ष श्री.राजेश टोपे यांच्या मार्गदर्शना खाली कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंबड व व्ही.आर.दाडगे लायब्ररी फाउंडेशन, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत २०४७ या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय अधिवेशन अंबड येथे नुकतेच संपन्न झाले.दि.१५ ऑगस्ट २०४७ रोजी साजरा करण्यात येणाऱ्या भारतीय स्वातंत्र्याच्या १०० व्या वर्धापन दिना चेऔचित्य साधून भारत देशाला एक विकसित राष्ट्र बनविण्यासाठी विकसित भारत २०४७ ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना भारत सरकारने मांडली आहे. या योजनेअंतर्गत देशाची आर्थिक उन्नती, आधुनिक तंत्रज्ञान विकास,युवा,गरीब, महिला व शेतकरी या चार घटकांच्या सक्षमी करणावर विशेष भर देण्यात येणार आहे. सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण,आरोग्य सुविधा, प्रगत तंत्रज्ञान,भौतिक सुधारणा,सामाजिक विकास,समृद्ध अर्थ व्यवस्था,अन्नसुरक्षा, जलसंधारण,पर्यावरण विकास,दारिद्र्य निर्मूलन,कृषी व औद्योगिक क्षेत्र विकास,सक्षम व पारदर्शक प्रशासन, ग्रीन एनर्जी विकास इत्यादींच्या माध्यमातून खेडी,शहरे,राज्य व देश समृद्ध बनवणे हा या योजनेचा हेतू आहे.केंद्र सरकारची ही संकल्पना



यशस्वी करण्यासाठी सर्व स्तरावर नियोजन करून त्यानुसार प्रगती कडे वाटचाल करणे यासाठी सामुदायिक प्रयत्नाची आवश्यकता आहे असे ते पुढे म्हणाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित होते. यावेळी कर्नाटका विद्यापीठाचे डॉ.गुरुराज हडळगी,एसएनडीटी विद्यापीठाचे डॉ.सुभाष चव्हाण,डॉ.बी.आर. गायकवाड,डॉ.नितीन दगडे,डॉ.जे.एन. कुलकर्णी,डॉ.जी.डी. सागर,डॉ.व्ही.एम.पवार इत्यादींनी मार्गदर्शन केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महा विद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.शिवशंकर घुमरे व महाविद्यालयाचे सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर राष्ट्रीय अधिवेशनास देशभरा तून विविध विद्यापीठे व महाविद्यालयाचे सुमारे ८० पेक्षा अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते.

# राज्य शासनाचा गरिबांचा आनंदाचा शिधा थाबला; सणाचा आनंद हिरावला

## गोरगरिबांच्या आनंदात विरजण, दसरा–दिवाळीच्या तोंडावर लाभार्थ्यांमध्ये नाराजी

किल्लेधारूर (मोमीन इर्शाद)

सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून राज्य सरकारतर्फे गरिबांना दिलासा देण्यासाठी आनंदाचा शिधा योजना सुरू करण्यात आली होती. यात गहू, तांदूळ डाळ, साखर, तेल, रवा, मैदा आधी साहित्याचा समावेश असलेला आनंदाचा शिधा दिवाळी, दसरा, गुढीपाडवा, गौरी गणपती यासारख्या सणामध्ये लाभार्थ्यांना शंभर रुपयात पुरवण्यात येत होता. मात्र गेल्या वर्षभरापासून या योजनेला अचानक ब्रेक लागला आहे.धारूर तालुक्यातील १२० स्वस्त धान्य दुकानामार्फत सर्व लाभार्थ्यांना हा आनंदाचा सुद्धा पोहच करण्यात येत होता. पूर्वी मिळणाऱ्या संपूर्ण किटमध्ये डाळ साखर पामतेल, रवा मैदा आणि तूरदाळ यांचा समावेश होता. परंतु मे २०२४ पासून ही योजना पूर्णपणे बंद करण्यात आली असून आता केवळ गहू आणि तांदळाचा पुरवठा केला जात आहे यामुळे गोरगरिबांनी आता सण उत्सव कसा साजरी करायचा असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा टाकला आहे. महागाईने डोके वर काढले असताना बाजारातून डाळ साखर तेल विकत घेणे गरीब कुटुंबाच्या आवाक्याबाहेर गेले आहे त्यामुळे अनेक कुटुंबावर संकट कोसळले आहे. गहू आणि तांदूळ मिळतात पण आमचं पोट फक्त त्यावर कसं



भरायचं सरकारने फक्त निवडणुकीमध्ये मते मिळत मिळावीत यासाठीची योजना सुरू केली होती का? असा सवाल लाभार्थी उपस्थित करीत आहेत. दसरा दिवाळी सारखे मोठे सण समोर आले असताना आनंदाचा शिधा मिळत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.आनंदाचा शिधा का बंद झाला– महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०१९ पासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात आनंदाचा शिदा ही योजना राबवण्यात आली होती या योजनेमुळे गोरगरिबांना दोन घास आनंदाचे मिळत होते परंतु शासनाने स्वतःच्या फायद्यासाठी विविध योजना सुरू केल्यामुळे या योजनेकडे कानाडोळा झाल्याचे बोलले जात आहे.अनेक लाभार्थी धारूर तहसील कार्यालयात मारत आहेत चकरा गोरगरीब अनेक लाभार्थी धारूर तहसील कार्यालयात आनंदाचा अशी शिधा कधी भेटणार यासाठी चकरा मारत आहेत. परंतु शासनाकडून ठोस उपाय नसल्याने व तो आणखी तालुक्यात आला नसल्यामुळे अधिकारीही हतबल झाले असून याबाबत आम्हाला कुठली माहिती नसल्याचे सांगत आहेत परंतु गोरगरीब मात्र आनंदाचा शिधाकडे आशा लावून बसला आहे.

# गेवराई ते गोंदी बससेवा सुरू करण्याची मागणी

## प्रवाशांची मागणी ; रस्ता दुरूस्ती पूर्ण झाल्याचे पत्र

गेवराई (जिल्हा प्रतिनिधी शेख जावेद सर) गेवराई बस स्थानक वरून गेवराई ते गोंदी जाणाऱ्या एसटी बस वाहतुकीस कोणताही अडथळा होणार नाही, रस्ता वाहतुकीस योग्य आहे असे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आगार व्यवस्थापकांना कळवूनही या मार्गावरील बस बंद केल्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ही बससेवा सुरू करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.कोणतीही कल्पना न देताच बंद केली. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. बांधकाम विभागाने रस्ता वाहतुकीस योग्य असल्याचे पत्र गेवराई बस स्थानक आगाराला दिले आहे. तात्काळ प्रवाशांची




गैरसोय लक्षात घेता बससेवा सुरू करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. तसे केले नाही तर रस्त्यावर उतरू, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

ग्रामीण भागात तसन्तास खाजगी गाड्यांची प्रतीक्षा करावी लागत आहे. मात्र वेळेवर बस नसल्याने नाईलाजाने इतर खाजगी वाहनांद्वारे जास्त पैसे देऊन प्रवास करावा लागतोय अद्यापही गेवराई तालुक्यातील गेवराई ते गोंदी यासारख्या ग्रामीण भागात बससेवा नियमित सुरू झाली नाही. नववी ते बारावीपर्यंत विद्यालये सुरु आहेत. या मार्गावरील एस.टी. बसेस सुरू करणे गरजेचे झाले आहे.



# मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांचा माजलगाव तालुक्यातील पुरग्रस्त गावांत दौरा

माजलगाव - आज दि. २७.०६.२०२५ रोजी जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी तालुक्यातील पुरग्रस्त भागांचा दौरा केला. त्याचबरोबर देपेगाव व गंगामसला या ठिकाणी टँकरद्वारे शुध्द पाणी पुरवठा करण्याचे आदेश दिले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, अतिवृष्टी व पुरामुळे माजलगाव तालुक्यातील नदीकाठच्या गावचे जनजीवन विस्कळित झालेले आहे. यासाठी जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान परीस्थितीचा आढावा घेण्यासाठी टाकरवण, मंजरथ, देपेगाव याठिकाणी भेटी देऊन नागरीकांच्या समस्या जाणून घेतल्या. यामध्ये उपस्थित नागरिकांनी गावांमध्ये लाईट नसल्याने व पुरामुळे पिण्याच्या पाण्याची, रोगराई चा प्रादुर्भाव यासह अनेक समस्या मांडल्या. जितीन रहमान यांनी आरोग्य विभाग, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना सदर समस्या निवारण करण्याच्या सुचना दिल्या. तसेच गंगामसला व देपेगाव याठिकाणी टँकरद्वारे शुध्द पाणी पुरवठा करण्याचे आदेश निर्गमित केले. यावेळी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक, विस्तार अधिकारी महेंद्र गायकवाड, विस्तार अधिकारी रामकृष्ण यादव, शाखा अभियंता धोंगडे, ग्रामपंचायत अधिकारी हनुमंत राऊत, ग्रामपंचायत अधिकारी दिनेश राऊत, ग्रामपंचायत अधिकारी प्रतापसिंह नाईक यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांनी आर्थिक मदत करीत स्वीकारली पतंगे यांच्या मुलांची शैक्षणिक जबाबदारी!

बीड / प्रतिनिधी

बीड शहरातील कपडच्याच्या दुकानावर काम करणारे भावसार समाजाचे राहुल ज्ञानेश्वर पतंगे (वय ३४ वर्ष, रा. काळा हनुमान ठाणा, साळी गल्ली, पेठ बीड.) यांनी ओबीसी समाजाचे आरक्षण संपुष्टात येथे की काय? या विवंचनेतून गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेची तात्काळ दखल घेत ओबीसी नेते तथा विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी एक लाख रुपयांची आर्थिक मदत पतंगे कुटुंबीयांना केली असून पतंगे यांच्या दोन्ही मुलांची शैक्षणिक जबाबदारी स्वीकारली आहे. पतंगे यांचे चिरंजीव श्रीकांत राहुल पतंगे यांना एक लाख रुपयाचा धनादेश विजय वडेट्टीवार यांनी सुपूर्द केला.



महाराष्ट्र शासन मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटियर लागू करून कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गामध्ये समाविष्ट करीत असल्याने आता ओबीसी समाजाला आरक्षण मिळणार नाही, ओबीसी समाजावर अन्याय होत आहे, आता आपल्या पोरांच्या शिक्षणाच आणि नोकरीच कस होणार? या विवंचनेतून बीड शहरामध्ये भावसार समाजातील युवक राहुल ज्ञानेश्वर पतंगे (वय ३४ वर्ष) यांनी बुधवार दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी बीड शहरापासून जवळच असलेल्या दीपमाळ परिसरात गळफास घेऊन आत्महत्या केली. राहुल पतंगे यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, भाऊजयी, दोन मुले असा परिवार आहे. बीड येथील एका कापड दुकानांमध्ये सेल्समन म्हणून ते काम करीत होते. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतल्यापासून राहुल पतंगे यांच्या मनात चलबिचल सुरू होती. याबाबत त्यांनी आपल्या पत्नीस देखील अनेक वेळा आता आपल्या मुलांच्या शिक्षणाचे, नोकरीचे कसे होणार? आपल्याला आता आरक्षण मिळणार नाही. अशी खंत बोलून दाखवली होती. राहुल पतंगे यांच्या खिशामध्ये पेठ बीड पोलिसांना सुसाईड नोट देखील मिळाली होती. यामध्ये देखील त्यांनी आपण ओबीसी आरक्षणासाठी आत्महत्या करीत असल्याचे नमूद केले आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्याने पतंगे कुटुंबीयांवर मोठे दुःख कोसळले होते.

याप्रसंगी ओबीसी नेते तथा विधानसभेचे माजी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्याशी बीड येथील राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता विजय वडेट्टीवार यांनी तात्काळ पतंगे कुटुंबीयांशी संपर्क साधून ओबीसी समाजाच्या हितासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन त्यांच्या दुखात सामील होण्याचे धाडस विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दाखवले. तात्काळ पतंगे कुटुंबीयांना तातडीने एक लाख रुपयांची आर्थिक मदत करून शासनाच्यावतीने दहा लाख रुपयांचा निधी व कुटुंबात एक व्यक्तीस शासन दरबारी नोकरी दिल्या जाईल असे आश्वासन देत पतंगे कुटुंबाच्या पाठीशी खंबीर उभा राहण्याची भूमिका बोलून दाखवली. यावेळी भावसार समाजाचे नेते प्रकाश कानगावकर, सोनार समाजाचे ड. संदीप बेदरे यांची उपस्थिती होती.



# राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब घुले यांचा स्तुत्य उपक्रम

## १०० महिलांनी घेतले मोफत मोहटादेवीचे दर्शन

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील केळसांगवी येथील अनेक महिला नवरात्रीच्या उत्सवात देवीचे दर्शन घेण्यास इच्छुक असतात, परंतु काही कारणांमुळे जाऊ शकत नाहीत. अशा महिलांसाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब घुले यांच्या वतीने खास आयोजन करण्यात आले होते. शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त महिलांसाठी मोहटादेवी दर्शन सोहळा दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता.

यावेळी गावातील १०० पेक्षा जास्त महिलांना मोहटादेवीचे दर्शन घडविण्यासाठी मोफत बस सेवा पुरवण्यात आली होती. भाऊसाहेब घुले व त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीम. रेखाताई घुले यांच्या संकल्पनेतून आतापर्यंत हजारो महिलांनी मोहटादेवी दर्शनाचा लाभ घेतलेला आहे. यंदा पाचव्या माळेला गावातील १०० हून अधिक महिलांची प्रवासाची व्यवस्था, भोजन, पिण्याच्या पाण्याची सोय, चहापाणी, नाष्टा तसेच दर्शनाची नियोजनबद्ध आखणी ही सर्व जबाबदारी स्वतः सांभाळत स्वखर्चाने गावातील महिलांना मोहटादेवीचे दर्शन घडविले. महिलांनी भाऊसाहेब घुले यांचे आभार मानत हा आमच्यासाठी अविस्मरणीय अनुभव होता. अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. नवरात्र उत्सवात महिलांना मोहटादेवीचे दर्शन झाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण आनंद दिसत होता. यावेळी बोलतांना भाऊसाहेब घुले यांनी सांगितले, आम्ही गावात सततच वेगवेगळे उपक्रम राबवत असतो. आता नवरात्र सुरू आहे. ज्या महिलांना आपण देव्हाऱ्यातील देवता मानतो, त्यांना देवीच्या दर्शनाला घेऊन जाण्याचा एक संकल्प होता. तो पूर्ण केल्याचा मनस्वी आनंद आहे असे शेवटी त्यांनी सांगितले.

# बीड जिल्ह्यातील अतिवृष्टी झालेल्या नुकसानग्रस्त भागाचा काँग्रेसचा पाहणी दौरा

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बीड तालुका येथील पाली व कुर्ला,गेवराई तालुक्या तील हिरापूर व इटकूर, शिरूर कासार तालुक्यातील निमगाव नांदेवली,ब्राह्मनाथ येळंब व सवसवाडी आदी पूरग्रस्त भागाची पाहणी करून या गावांमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे अनेकांच्या संसाराची राख रांगोळी झाली भिजून वाहून गेलेल्या घरांना भेटी दिल्या.व्यथा मांडताना घर उध्वस्त झालेल्या कुटुंबाचे अश्रू अनावर झाले होते.गावातील शेतकरी बांधवांचे सर्वस्व या पावसाने हिरावून घेतले आहे. उभं आयुष्य कष्ट करून शेतीतुन चार पैसे हाती येतील म्हणूल शेतकरी राबला मात्र हाताशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला सोयाबीन, कापूस व खरीप पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे कष्ट डोळ्यासमोर वाहून गेलेले पाहून मन हेलावून गेले.जनावरां साठीचा चारा,शेतातील बियाणे,साठवलेले अन्नधान्य सगळं काही वाहून गेलं आहे.डोळ्या देखत जनावरे वाहून जाताना बघून वेदना सांगताना शेतकऱ्यांचा बांध फुटला होता.

शेतकरी शेतमजूर, व्यापारी बांधवांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दुकानात पाणी घुसल्याने संसाराचा गाडा उभा करणाऱ्या अनेक कुटुंबांवर मोठे संकट आले आहे.इथलं आभाळच फाटलय पण अस्मानी संकटेपेलताना सरकारने तात्काळ



भरीव मदत करावी अशा सूचना जिल्हाधिकारी,तहसीलदार,तलाठी,ग्रामसेवक, कृषी सहाय्यक,मंडळ अधिकारी यांच्याशी संवाद साधून घरांची पडझड,शेतीतील नुकसान व व्यापारी बांधवांचे नुकसान याबाबत तात्काळ मदत देण्याच्या सूचना दिल्या.

या पाहणी दौऱ्यात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री मा.श्री अशोकराव पाटील,खा. डॉ.शिवाजीराव काळगे, प्रदेश सरचिटणीस श्री. दादासाहेब मुंडे,श्री. गणेश राऊत, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे,जिल्हा उपाध्यक्ष प्रविणकुमार शेप,श्री.नवनाथ थोटे,

युवककाँग्रेसजिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे,बीड तालुकाध्यक्ष श्री.गणेश बजगुडे,गेवराई तालुका अध्यक्ष महेश बेदरे, शिरूर तालुका अध्यक्ष भास्कर केदार,बीड शहराध्यक्ष परवेज खुरेशी,राजाराम पवार, श्री.प्रताप मोरे,श्री. प्रवीण सोट,श्री.गणेश जवकर,महिला तालुकाध्यक्ष विविध गावातील सरपंच,उप सरपंच ग्रामपंचायत सदस्य काँग्रेसचे पदाधिकारी,कार्यकर्ते, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येनेउपस्थित होते.

# सातेफळ गावात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान ; सरपंच व शिवसेना पदाधिकारी यांनी केली पाहणी

केज/प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे केज तालुक्यातील सातेफळ गावात मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या झालेल्या या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी सातेफळ ग्रामपंचायत चे सरपंच कृष्णा थोरात यांनी पहाणी केली.या पाहणीत शिवसेना तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील,केज तालुक्याचे विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, चिंचोली माळी सर्कल मधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे मालोजी नाना गलांडे, अरुण करपे यांच्यासह सातेफळ येथील शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सर्वांनी मिळून शेतकऱ्यांच्या



शेतात जाऊन अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान पाहिले व प्रत्यक्ष स्थितीची माहिती घेतली.यावेळी सरपंच कृष्णा थोरात यांनी सांगितले की, सातेफळ गावातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान लक्षात घेऊन शासनाकडून तातडीने भरपाई मिळावी या साठी आम्ही प्रयत्नशील आहोत.मात्र या लढ्यात गावातील सर्व नागरिकांनी एकत्र येऊन आवाज उठवणे आवश्यक आहे.आपण सर्वांनी शासनापर्यंत आपली मागणी पोंहोचवली,तरच शेतकऱ्यांना न्याय मिळू शकतो असे त्यांनी सांगितले. गावातील नागरिकांनी व शेतकऱ्यांनीही शासनाने लवकरात लवकर मदत व नुकसान भरपाई जाहीर करावी अशी मागणी केली आहे. अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान तातडीने नुकसान भरपाई द्यावी, यासाठी ग्रामपंचायत, पदाधिकारी आणि नागरिक यांचे एकत्रित प्रयत्न सुरू आहेत.या वेळी शिवसेनेचे विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे यांनी शेतकऱ्यांना धीर दिला आहे.



शिरूरकासार (प्रतिनीधी)- शहरामध्ये पूरग्रस्त कुटुंबांना मुस्लिम समाजाच्या वतीने जिवनावश्यक वस्तू वाटप करून त्यांच्या अडचणीच्या काळात आम्ही आपल्या सोबत आहोत असा संदेश दिला. तालुक्यात मोठ्या प्रमाणात होत असलेल्या पावसामुळे सिंदफणा नदीला अनपेक्षित पूर आला, अनेकांचे राहते घर,दुकान वाहून गेले. अशा संकटकाळी माणुसकी धर्म पाळत शहरातील मुस्लिम बांधवांनी पूरग्रस्तांना आधार देण्याचा प्रयत्न करत किराणा सामान व जिवनावश्यक वस्तूंचे वाटप केले आहे. यावेळी मरकज मशीदचे इमाम हाफीज अब्दुल जब्बार पठाण,अमीरसाहेब जब्बार पठाण,फयाजभाई शेख,जमीर जीलानी बागवान, सत्तार शेख,शमशुद्दिन शेख, अन्वर पठाण,इजारोद्दीन इनामदार,कौसर(मुन्ना)शेख, मुबारक शेख,महंमद शेख,बाबा कुरेशी,लायक शेख,कादर शेख,रफिक शेख, सोहेल पठाण,सलमान,साद,आसीम,आसिफ सह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड - शहरातील लक्ष्मण नगर, फुलेनगर, चंपावती नगर मधील नवरात्र महोत्सव देवीची पूजा, आरती करताना या प्रभागाचे भाग्यविधाते लोकप्रिय मा. नगरपालिका सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील. यावेळी महेश जाधव, दीपक जाधव, लाला वाघमारे, कृष्णा शेरकर, महेंद्र वाघमारे, शशिकांत जावळे इत्यादीसह महिला भगिनीसह भाविक भक्त उपस्थित होते.

# मेहकरी नदीला महापुर.. महाभयंकर, महापूर भयावह पूरस्थिती

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील मेहकरी पाणलोट क्षेत्रात हरेवाडी, मराठवाडी, केळ, पिंपळगाव घाट, दौलावडगाव परिसरात पुन्हा शनिवारी दुपारी ढगफुटी झाल्याने दुसऱ्यांदा मेहकरी नदीने रौद्ररुप धारणा केले आहे. महापुर..भयानक, भयवाह परिस्थिती निर्माण झाली आहे.

मेहकरी धरणाच्या सांडव्यावरुन ४ ते ५ फुट उंचीने पाणी वाहत आहे. पूररेषा ओलांडली आहे. मेहकरी नदीच्या काठावरील आनंदवाडी, सराटेवडगाव, रुईनालकोल, नांदा, धीर्डी, शिराळ या गावातील धोका निर्माण झाला आहे. या भागातील



शेतकऱ्यांच्या नदीकाठाच्या जमीनी पिके फळबागा, जनावरे वाहुन गेल्या विहीरी बुजल्या आहेत. शेतकऱ्यांचे प्रचंड

नुकसान झालेले आहे. बळीराजा हवालदिल झाला आहे. शेतकरी आजपर्यंत उन्हाने सुकला. काही दिवस गाळात फसला तर आता पाण्यात वाहून गेला. मेहकरी नदीतून पाणी विसर्ग मोठ्या प्रमाणात होत आहे. नदीची पाणी पातळी जलदगतीने वाढत आहे. पिंपळगाव, मेहकरी, आनंदवाडी, सराटेवडगाव, रूईनालकोल, नांदा,षधिर्डी व शिराळ नदीकाठच्या लोकांना प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा दिला आहे.

दरम्यान आज टाकळी अमिया, सराटेवडगाव, आनंदवाडी, रुईनालकोल पुरग्रस्त भागाचा माजी आ. भीमराव धोंडे यांनी दौरा केला. यावेळी टाकळी अमियाचे सरपंच सावता ससाणे, सराटेवडगावचे सरपंच भीमराव बोडखे, चेअरमन बबन नन्नवरे, उत्तम बोडखे, कचरु भुकन, बाळासाहेब भुकन, रविंद्र भुकन, महादेव नन्नवरे, संजय नालकोल आदि मान्यवर उपस्थित होते.

# महाविकास आघाडीचा शेतकरी बैलगाडी आक्रोश मोर्चा तहसीलवर धडकणार

## मोठ्या संख्येने उपस्थित राहा:- मुळे,जमाले,आंधळे

वडवणी/प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी महाविकास आघाडीच्या वतीने दि.१आक्टोबर २०२५ बुधवार रोजी सकाळी १०वा.वसंतराव नाईक चौकापासून तहसील कार्यालयावर बैलगाडी आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा तालुक्यातील शेतकरी बांधव आपल्या पारंपरिक बैलगाड्यांसह घेऊन तहसील कार्यालयावर धडकणार असून, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी हा लढा उभारला जाणार आहे.तरी सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महादेव जमाले, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ज्ञानदेव आंधळे यांनी केले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक लोकप्रिय खा. बजरंग सोनवणे, राष्ट्रवादीचे माजलगाव मतदार संघाचे नेते मोहन जगताप, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

ओला दुष्काळ जाहीर करावा यासह खालील मागण्या .सरसकट शेतकऱ्यांना कर्जमाफी करा, शेतकऱ्याला सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान जाहीर करा,पाऊसात मुत्यू मुखी पडलेल्या गाय,म्हैस, बैल ५० हजार रुपये मदत करा,शेळी,मेंढी मृत्युमुखी पडलेल्या १५ हजार रुपये मदत करा,खतांवरील जीएसटी रद्द करा,पिएम व सिएम चे वंचित शेतकऱ्यांना अनुदान देण्यात यावा,पिक विमा तात्काळ देण्यात यावा.यासह अनेक मागण्यासाठी महाविकास आघाडीचा शेतकरी अक्रोश बैलगाडी मोर्चा सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष महादेव जमाले, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ज्ञानदेव आंधळे यांनी केले आहे.तहसील कार्यालयासमोर शेतकरी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर करून शासनाला जागे करणार आहेत.